# कुंचल्यातील मोरपंखी कविता

विष्णु थोरे




अक्षरचित्रे
विष्णू थोरे,चांदवड .
९३२५१९७७८१



तुम्ही वाचताय..
जीव लावताय..
जपताय.
म्हणुन
तुम्हालाच अर्पण...!



# मनातलं....

अक्षरपेरणीच्या अंकासाठी सुरूवातीला काही अक्षरचित्रे केली. माझी चित्रे आणि मित्र शिव डोईजोडे यांचे अक्षर असायचे. नंतर 'एक कवी,एक कविता' असा उपक्रम सुरू केला. सर्वांना आवडला. जमेल तसे करत होतो सवडीने. प्रवीण जोंधळे या मित्राने कविता फ्रेम करून त्याच्या हॉटेल मध्ये लावल्या. बरेच कौतुक झाले. अनेकांनी ही अक्षरचित्रे जतन करून ठेवली. काही मित्रांनी मुद्दाम मानधन दिले. खूप आधार झाला. याचं रंगित पुस्तक छापावे असाही विचार होता. पण खर्च कुणी करायचा हा प्रश्न ? म्हणून ई-बुक करूया असे नामदादाला म्हणालो. ते तयारच. मग काय..अशा एकत्र सर्व कविता आपल्यासाठी घेऊन येतोय. अभिप्राय कळवाच..मी प्रतिक्षेत.

-विष्णू थोरे,चांदवड.
९३२५१९७७८१



# प्रस्तावना...

मराठी साहित्यातल्या काव्यप्रांतात आपल्या कवितांसह पुस्तकांच्या मुखपृष्ठांच्या कलाकुसरीत कवी/चित्रकार विष्णू थोरे हे नाव आता सुपरिचित झाले आहे. कवितेसह कवितेच्या उत्तम सादरीकरणामुळेही विष्णूचा बोलबाला आहे. पण इतरांच्या चांगल्या कवितांना आपल्या कवितेपेक्षा जास्त जीव लावणे हे अस्सल कलावंताचं जगणं विष्णू जगतो आहे. तो ए-हवी अंतर्मुख असतोच पण एक्कलकोंडा न राहता लोकाभिमुख होतोय हे लक्षण मला लक्षणीय वाटते.

'कुंचल्यातील मोरपंखी कविता' हा ई-बुक चित्रकाव्याचा पहिला-वहिला काव्यसंग्रह विष्णूने आपल्यासमोर सादर केला आहे. महाराष्ट्रातील १७० लहानथोरांच्या कवितांवर विष्णूने काढलेली चित्रे आणि अक्षरे केवळ वाचनीय नाही तर शोभनीय, रमणीय आणि विलोभनीय झाली आहेत. या रंगीत-संगीत काव्यचित्रांसमोर माणूस थांबतो, पाहतो, वाचतो, थबकतो आणि विचारपूस करायला लागतो. प्रविण जोंधळे या प्रकाशक मित्राच्या हॉटेल 'रिलॅक्स कॉर्नर' मध्ये ही किमया घडते. त्याच्या हॉटेल मध्ये या सर्व कविता फ्रेम करून सर्वांना वाचनासाठी खुल्या केलेल्या आहेत. या निमित्ताने विष्णूने महाराष्ट्रातील कवी/कवयित्रींचे महासंम्मेलन भरवले आहे. कुंचल्यातून जादूमयी किमया घडली आहे. शब्दांसह चित्रांची अक्षरांची मोरपंखी कविता आपल्या पापण्यांवरून अलगद मोरपीस फिरवते आणि अलौकिक आनंद देऊन जाते.

विष्णू तुला आणि या कुंचल्यातील मोरपंखी कवितांना काळीजभर शुभेच्छा आणि तुला विनम्र सलाम...!

-लोककवी प्रशांत मोरे

# गाव...

टकल केलेले डोंगर
झाल्या रस्त्यांना कांजण्या
नवरा मारून निघाली
विधवा सजण्या

संभाळून प्रेते
जपायच्या खाणाखुणा
माझ्या गावामध्ये झाला
शेतकरी पाहुणा

मातीला सुटला
सिमिटाचा वास
कुठे गेले कावळे
कुठे चिमण्यांचीरास

पितामह भिष्मासारखे
पडले आहे मृत्युशय्येवर लाकडाचे ओंडके
आणि वाढत चाललेत
रावणाचे एक एक मुंडके


जमिनीला घट्ट पण वरती निमुळती
होत चालली आहेत माणसं
आता चित्रामध्येच दिसतात
पिकांची डोलणारी कणसं

कान तुटलेल्या माणसांचा थवा
एन. ए. एन. ए. करत
पळत सुटला आहे शहराच्या दिशेनं
शिवारातल्या बोरी बाभळीच्या अंगात
ताप भरलाय कशानं ?

- गणेश मोगल
नाशिक



अक्षरचित्र-विष्णू थोरे



उजळेन तरीही...
अक्षरचित्र-विष्णू थोरे
ही सांज किनारी मौनातुन का येते
अन क्लांत जळावर आर्त कुणाचे गाते
का सूर लागतो तिचा जिव्हारी कातर
अंतरात फुटतो आठवणींना पाझर
दडविले काय मन डोहाच्याच कपारी
लागते निघाया अंधाराच्या द्वारी
तिमिराच्या हाती मम दुःखाच्या वाती
उजळेन तरीही कुण्या यात्रिकासाठी.
- मृणाल / विनिता घाटे
पुणे.

# माझं गीत-तुझी चाल



मी माझ्या गाण्यात डोकावते
तेव्हाही घेतोस 'हरकती'
पहाटे रियाजात यावं तरी
तुला 'तान'च वाटते मी..!

रोज रोज तुझ्या 'ताला'वर
नाचायचं ठरवलं तरी
'समे'वर येता येत नाही
'काल' बदलतो तशा
अपुऱ्याच पडतात 'मात्रा' काही

मी एकदा गुणगुणले
आपल्या दोघांत अंकुरणारी
अलवार 'बंदिश'
तेव्हा तू म्हणालास 'भैरवी' घ्या
अन मैफल थांबवा...

मीही ठार ठार वेडीच
'इलेक्ट्रानिक तानपुरा'
सुरात नसल्याची सबब सांगत
म्हणाले - 'अवरोही'...

नंतर कळलं की
तुला 'तराणा' हवा होता
तुझा तो कोणता तरी
'घराणा'-चालविण्यासाठी

असं हे कुठवर चालायचं रे
माझं गीत, तुझी चाल
अन माझी प्रीत, माझेच हाल..!

-प्रभाकर साळेगावकर
माजलगांव (बीड)

अक्षरचित्र-विष्णू थोरे

# तीर्थरूप बाप...

कसा उमगेना, लिहिण्या जमेना ।
शब्दांत मावेना, बाप माझा ॥१॥

झुळझुळ पाणी, मधुर ती वाणी ।
तुलना न कोणी, बाप माझा ॥२॥

अंधाना आरसा, कळे ना फारसा ।
समृध्द वारसा, बाप माझा ॥३॥

काव्यात्म काव्यता, दिव्यत्व दिव्यता ।
आकाश भव्यता, बाप माझा ॥४॥

जपणार नीती, आम्हांवर प्रीती ।
वर्णावा तो किती, बाप माझा ॥५॥

जीवना शिखर, कुटुंबा मखर ।
जणू की बखर, बाप माझा ॥६॥


काय बोलू आता, बापाचीच गाथा ।
सांगवे न आता, बाप माझा ॥७॥

नित्य विश्वरूप, देवाचंच रूप ।
मला तीर्थरूप, बाप माझा ॥८॥


- रविराज सोनार, पंढरपूर




अक्षरचित्र-विष्णू थोरे


सौंदर्य कुशीवर वळते
थकलेल्या खांद्यावरूनी
वस्त्रांचे ओझे गळते
पांघरून अंधाराला
सौंदर्य कुशीवर वळते...
संकोच निखळतो आधी
सुटतात बोलक्या गाठी
निःशब्द आर्जवे नुसती
काकणे काढण्यासाठी...
आलिंगन हाक अबोला
होकार नकार दुरावा
श्वासांना शेवट कळतो
स्पर्शाचा हतबल कावा...
तृष्णेच्या म्लान घणाने
फुटतात तमाचे कातळ
हा एकांतातिल उत्सव
की धगधगते वडवानळ...
या सुगंधीत शिखराच्या
आहे पल्याड विसावा
जेथून उसळता सागर
डोळ्यांना पुन्हा दिसावा...
· संतोष वाटपाडे
नाशिक
अक्षरचित्र-विष्णू थोरे


उभा कर विटेवरी...
गंधाळल्या सपनांनी
बाचं जगणं सजलं
विठुराया पंढरीत
कुणी भज ळलं
तुझ्या चंद्रभागे तीरी
कसा पडला दुष्काळ
आला पाणी चोरण्याचा
माझ्या बापावर आळ
झाला कुठला हा न्याय
केलं परकं जगणं
ऐनवेळी बळीराजा
घेतो झाडाला टांगून
झाली पोरकी लेकरं
देवा तुझ्या पंढरीत
कसा घावा सांग जीव
जिव्हाळ्याच्या कासयात
देवा दिलास जलम
माथी हाडोट अभाळ
पाणी गेलया वाहून
आला डोळयात दुष्काळ
माझ्या माथ्याचं जगणं
बाच्या सुखात कोरावं
सुख भरून अंगण
चांदण्यांनी खळाळावं
ज्ञाना तुका जनाबाई
तशी जगतेय आई
दुःखं पाखडण्या आता
कर आता जरा घाई
एक मागणं रं देवा
लाव आग त्या पाण्याला
उभा कर विटेवरी
तुझ्यागत माझ्या बाला
अक्षरचित्र-विष्णू थोरे
- कु. शितल सत्यवान गाजरे
पंढरपूर


यशाचं गाणं...
खूप खूप कष्ट करून
संपादन करतात विद्या
तीच मुलं स्पर्धेत
टिकू शकतात अद्या
पुस्तकां बरोबरच बाहेरचं जग
ज्यांना वाचता येतं
ज्ञानकण वेचून त्यांना
मन खंबीर करता येतं
अष्टपैलू व्यक्तीमत्व
ज्यांना घडवता येतं
जीवन सप्तरंगी
त्यांनाच जगता येतं
जिद्द आत्मविश्वास
रुजवतात जे मनी
तीच मुलं यशाची
गात असतात गाणी
- आबा गोविंदा महाजन
२, हिराशिवा कॉलनी, जळगांव,
जि. जळगांव. ४२५००१.
मोबा. ९४२३९२०८८
अक्षरचित्र-विष्णू थोरे


उंबऱ्यात क्षितिजाच्या...
काढीत माग आत्म्याचा खोलात भटकतो आहे
एकेक पायरी माझ्या मी आत उतरतो आहे
मन शांत शांत होताना उठतात वादळी लाटा
कुठला समुद्र हा माझ्या देहात उसळतो आहे
लक्षात स्पष्ट आलेले कारण उगाच हरण्याचे
माझ्यामधील भाग्याचे तण मीच उपटतो आहे
इतके दिवस कधी नाही धावून संकटी आला
पण थेंब थेंब तो हल्ली माझ्यात झिरपतो आहे
आकाश चालले आहे घेऊन पाखरे सारी
अन एकटेपणा येथे पंखात पसरतो आहे
ठरवून खूपदा झाले 'आता निघायचे नक्की'
मग उंबऱ्यात क्षितिजाच्या का पाय अडकतो आहे?
- आनंद पेंढारकर
अक्षरचित्र-विष्णू थोरे


आठवेत का..?
आठवले का पहाट ती धुक्याची
बेधुंद सर त्या.. दिसांची
दाट पावसात हरवलेली
ती वाट डोंगर पावलांची


हात हाती सख्या माझा
डोळ्यात तळी पावसाची
पाहताना मनी भरलेली
गाणी तव हिरव्या रानाची

आभाळदेही.. फुललेली
मखमली फुले ती दवाची
श्वासात तू... टिपलेली
गोडी मन मधाळ ओठाची

बाहूत घेता मन भिजलेली
नयनात अबोल... प्रितीची
गाणी तू श्वासात गायलेली
उमलताना पाऊले इंद्रधनुची

खेळ ऊन सावल्यांचा अंबरी
फुलतांना स्वर गाणी पाखरांची
माझ्या केसात... माळलेली
ती फुले गंध सोनचाफ्याची...
- सौ. तनुजा ढेरे
पुणे
अक्षरचित्र-विष्णू थोरे


आता
भूमी निर्वंश झाल्याचे दुःख मनात असतानाच
हत्तीने माणसांनाच निर्वंश करायला प्रारंभ केला
हत्तीच्या गर्जनेने
ओल्या बाळंतिणीचाही पान्हा सुकू लागला
उदरातील गर्भ गुदमरू लागला
आता माणसं
मंदबुद्धी झाल्याची खात्री पटल्यावर
हत्ती एवढा बोकाळला
एवढा बोकाळला
की, त्याने आधी माणसांना गृहीत धरले होतेच
आता माणसंही त्याला गृहीत धरू लागली!
हत्ती आणि माणसांचा असा खेळ
हल्ली रोज नव्याने खेळला जातोय सर्वत्र!
- अजय कांडर
चित्र-विष्णू थोरे


॥ नवी चळवळ आता कुणब्याची ॥
आता कुणब्याला । करो खाणखुणा
पिकविण्या दाणा । स्वतःसाठी...
आपूनच खावी । आपली भाकर
कोठाराची भर । करू नये...
नको देवधर्म । पंढरीची वारी
अशा येरझारी । थांबवाव्या...
दारी घरी कुणी । करू नये उभा
सांगावे कुणबा । सुधारला...
जादा पिकवूनी । फिरू नै बाजारी
गत ही भिकारी । ठेऊ नये...
बापजादे शेत । विकू नये कुणी
लाऊ नये उभी । संसाराला...
लग्नाच्या पोशिंदा । नको पुरस्कार
हाच सोपस्कार । नडलेला...
खाशी चळवळ । करावी एकदा
जगाची आपदा । होवो द्यावी...
- संतोष पद्माकर पवार
अक्षर-शिवा डोईजोडे
चित्र-विष्णू थोरे

# आरक्ती

लाल रंग...
नव्यानेच उमगू लागलाय मला...
जितका उमगतोय....
तितकाच रूतत जातोय माझ्यात,
खोल..खोल...
त्याची भावगर्भ छटा... माझी...
माझ्यासाठीची...
भाळी लेवून मिरवते आताशा...
तुझ्या तळहातावरचा आरक्त ओघळ...
मनानं ठसत जातो
माझ्या गर्भावरही...
नि गर्भाळतो माझा गर्भ...
पुन्हा पुन्हा नव्यानं!
आता ही तांबडी संध्या छाया
पुरेल त्या टोकापर्यंत...
माझ्या शेवटच्या ज्वालांची लालीही
अशीच दिसेल ना?
आभाळाला भिडेल तेव्हा...

पण एक ऐकाल देवा,
पून्हा हे वहार्ण नको
ती एक आरक्त सर पुरे...
मला मढवायला...
फुलायला...
गर्भाळायला...
तुझ्या कवितांची आई होतेय
हेच परमोच्च सुख...
माझ्या मातृत्वाचं...

-स्वाती पवार-गायखे
चांदोरी (नाशीक)



अक्षरचित्र-विष्णू थोरे


## कळवळ्याचा नोंद विरहीत सातबारा...


कोसळला पाऊस चादर चढवल्या शाली की,
नाचतो थुईथुई, होतो खुश बेहद्द
उरत नाही उभारीला हद्द
टाकतो डाव्या कंसात मोहल्ला
काळजी गळणाऱ्या छपराची
घेतो भित्रक्या गोधडयात झोप फकिरी
...
मागतो दरसाल मोहल्ला
दुआ अल्लाहच्या दरबारी
राहावी सुखरूप माणसे मातीत राबणारी
लागू नये ताणांना कोवळ्या वर्ज्य स्वर रागीट
वहावे जोमदार शिवारातले गाणे
भागवून पाखराटाकरांची भूक
पडावे कणगीत येऊन कंसातले दाणे
ठेव कायम घाम गाळणाऱ्यांच्या घासात
आमच्याही लेकराबाळांचा घास
फिरकू देऊ नको किडामुंगी
रुजणाऱ्या बियाण्याच्या आसपास
...
बघितली माना टाकणारी पिके
की, लागतात जिवाच्या डोळ्यांना धारा
जपतो पिढ्यानपिढ्या मोहल्ला
कळवळ्याचा नोंद विरहीत सातबारा
अन् ओलावतो
माझ्या कवितेतला प्रदेश कोरडवाहू

- अझीम नवाज राही



अक्षरचित्र-विष्णू थोरे


असं आभाळ होऊन
रितं व्हावं तुझ्या दारी
तुही झेल्याव्यात मग
थेंब भरलेल्या सरी
थेंब पडतो पानात
पान भीजून बसते
तुझे श्रावणाचे रूप
मला पानात दिसते
पान पानाला भेटते
अन शृंगार सजतो
तुझ्या आठवांचा मेघ
मग डोळ्यात भिजतो
देह सावळा मातीचा
शहारतो बावरतो
माझ्या हिरव्या दुःखाला
पुन्हा पुन्हा सावरतो
- अमोल आगाशे
पाथर्डी, नगर
अक्षरचित्र-विष्णू थोरे



रडतोस कायवेड्या
रडतोस कायवेड्या संकट कुणास नसते
काट्यात बांधलेले घरटे सुखात असते!
त्रागा करून कुणाची दुःखे पळून गेली...?
कुरवाळले जरा की ती वेदनाच हसते!
दुःखास ही कधी तू टाळू नकोस राजा
प्रत्येक वेदनेच्या गर्भात सुख असते!
इतिहास शर्यतींचा डोळ्यासमोर आहे
खेळात साहसाच्या कायम नशीब फसते!
कित्येक मस्तकेही वाचून शून्य ठरली
प्रत्येक काळजाचे आभाळ होत नसते!
अस्तित्व शोधण्याचे साधे गणीत आहे
तू या जगात वसती हे जग तुझ्यात वसते!
- अनंत राऊत
अकोला
अक्षरचित्र-विष्णू थोरे


फुलोरा...
काळ्या काळ्या मातीतून
काय हिरवं पिकलं
काळ्या मातीशी पिकानं
उभं आयुष्य जपलं
हिरव्या हिरव्या शेतामंधी
गंध फुलोऱ्याचा येतो
तन मन धुंद होते
साद प्रीतीची घालतो
फुलोऱ्याशी झुले गंध
शेत गेलं गभरून
पसा पसा मोती त्याने
उधळले कणसांतून
असं कणीस देखणं
जशी मोतियांची लड
सारं शेत बहरलं
मन माझं झालं येडं
- सीमा सोनवणे
सटाणा
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# बायका बोलतात...

बायका बोलतात...

भाजीतल्या मिठावर
भाकरीच्या पिठावर
फोडणीच्या तेलावर
सासूच्या तालावर

बायका बोलतात...

जावेच्या मुलावर
नणंदेच्या फुलावर
झालंच तर आईवर
दुधावरच्या साईवर

बायका बोलतात...

पैठणीच्या काठावर
देवघराच्या ताटावर
ओसरीच्या ओट्यावर

बायका बोलतात...

नवऱ्याच्या शर्टवर
सासऱ्याच्या हार्टवर
ऑफिसच्या गेटवर
सिनेमाच्या सेटवर
फेसबुक अन नेटवर
फ्रेंड्स आणि डेटवर

बायका बोलतात

पाटलाच्या गढीवर
सरपंचाच्या माडीवर
उन्हाच्या क-ह्यात
सांजच्या पा-ह्यात

बायका बोलतात...

शेताच्या बांधावर
पोर एक खांद्यावर
हांडे दोन डोईवर
पाय भाजतात भुईवर

साऱ्याच बायका बोलतात...

बायका जेव्हा मनातलं बोलतात
उंबऱ्याच्या आतलं बोलतात...
काळजाचे दरवाजे खोलतात.
भडाभडा सारं ओकतात
आपल्याच जखमेची
जणू खपली काढतात
रित्या रित्या जगण्याला
आनंदाचं बळ देतात...

हलकं होतं मन
आणि वाटतं बरं
काढून सारं तण
जीव धरावा रोपानं

म्हणून.. बायका बोलतात...
हो बायका बोलतात...

- अनिल कोठे
पुणे.



अक्षरचित्र-विष्णू थोरे

# गड्या पाऊल उचल झपा झपा



झोपलास काय तू? गड्या जाग रे
थांबलास काय तू? पुढे निघ रे
नाहीतं वार होतिल सपासपा
गड्या पाऊल उचल झपाझपा...

मृगी पाऊस पडला
रानी सपानं पेरलं
असमानी संकटाने
पिक ज्वानीत घेरलं
सारं पिकच आडवं
गारा खाई रपारपा
गड्या पाऊलउचल झपाझपा...

काबाडकष्ट करून
पिकवलं सोनं सोनं
माल बाजारात जाता
दलालाचे मौनं मौनं
रानात पिकवशी तू
सावकार खाती नफा
गड्या पाऊल उचल झपाझपा...

साऱ्या जगाचा पोशिंदा
नाही कोणाचा शर्मिंदा
वरपून सारे रान
ढेकणाचा वाढे धंदा
नंबराचे गुंडे झाले
काळी माय जपा जपा
गड्या पाऊल उचल झपा झपा...

रडू नको, पडू नको
आत्महत्या करू नको
हंबरणाऱ्या गाईच्या
आयुष्याला बेरू नको
साकारलेल्या कष्टाने
मोडून जाईल खोपा
गड्या पाऊल उचल झपा झपा

- अण्णा जगताप, हिंगोली
९९२१५५९३९४

अक्षरचित्र-विष्णू थोरे


# सूर्य पाठीवर घेऊन फिरतांना...


सूर्य पाठीवर घेऊन फिरतांना
तुझ्या अंधारवाटा उजळून काढेन
याची शाश्वती बाळग
मला तिथेही पोचायचे आहे
ज्यांनी स्पर्शिला नाही
एकही किरण अद्याप,
मला उघडे पाडायचेत
त्यांच्या वाटांवर टोळक्यांनी जमलेल्या
काजव्यांचे थवे.
त्यांचे देव्हारे धुवायचेत लख्ख उजेडाने
त्यांना जाणिव होत नाही
संचितांची जळमटे तकलादू असतात याची
तोवर
त्या प्रत्येक पावलांच्या ठशात पेरणार आहे
सूर्याचा एकेक किरण.
न जाणो तिथेही उगवेल एखादे
प्रकाशाचे झाड
त्यांच्या भविष्यासाठी.
मग पाठीवरला सूर्य पोटावर घेऊन
शाश्वत भ्रमंतीला
पूर्णविराम द्यायला
तुझी साक्ष लागेल पुन्हा
नाहीतर
संजीवन समाधीचे गौंडबंगाल
तुला कळणार कसे?


- अरूण नाना गवळी
कल्याण



अक्षरचित्र-विष्णू थोरे


फायदा
उदास खिन्न खिन्नसे बसून काय फायदा
उगाच प्राक्तनावरी रुसून काय फायदा ?
असेल प्राक्तनात जे तसेच व्हायचे गड्या
पुन्हा पुन्हा कपाळ हे पुसून काय फायदा ?
कृतीत आणली न तू कधीच ओळ एकही
पढीक ज्ञान तेवढे असून काय फायदा ?
जिथे अनोळखी घरे, जिथे न सोबती सखा
रमे न जीव ही तिथे बसून काय फायदा ?
तिने न मानले तुला कधीकधीच आपला
तिचेच शिल्प अंतरी ठसून काय फायदा ?
मधाळ जाहिरात ही प्रलोभनेच दावते
करून मोहजाल हे, फसून काय फायदा ?
विराट भ्रष्ट चक्र हे लढून भेद तू आता
इथे तरी म्हणू नको घुसून काय फायदा ?
- अरुण सोनवणे
नाशिक
अक्षरचित्र-विष्णू थोरे


कंदिलाची काच
तो पवन नसला तरीही
वादळे उठतात ना
शांत एकांतात सुध्दा
वादळे उठतात ना
मी कशाला खोल जाऊ
सागराच्या त्या तळाशी
काठ तो भिजतो तिथे पण
वादळे उठतात ना
सांगुनी गेले चहाडी
कोण शेजारी कसे
भिंत होते कान तेव्हा
वादळे उठतात ना
प्राक्तनाला दोष तेव्हा
देऊनी बघतात का
भोवरा झाल्या जिवातून
वादळे उठतात ना
कंदिलाची काच छोटी
का हरवते वादळाला
वादळे फसतात तेव्हा
वादळे उठतात ना
- अस्मिता जोगदंड-चांदणे
अक्षरचित्र-विष्णू थोरे


बाप
दुर अंधार करण्या
बाप जळत राहिला
तेलासवे जळतांना
जाळ वातीने पाहिला

कोण सांगिन भाकीत
रेषा उरल्या ना हाती
ढेकळाच्या शिंपल्यात
झाले घामाचेच मोती
जन्म मातीत घेवून
जीव मातीला वाहिला
तेलासवे जळतांना....

कर्ज फिटता फिटना
कधी होईल वं पुरं
बापावाणी राबणारे
आता उरल्यात ढोरं
धार अश्रुंची पिळता
नेई खाटीक गाईला
तेलासवे जळतांना....

रविंद्र कांगणे, सिन्नर.
मो.- ७३५०६६७९००

# राहिली नाती कुठे..?

काळजाला व्यापणारी राहिली नाती कुठे?
पेटवू वाटे दिवा पण राहिल्या वाती कुठे?

उंच आकाशास भिडल्या चार भिंती बांधल्या
चांदण्यांनी सजवलेल्या राहिल्या राती कुठे?

बायका पोरांत रमला एवढा माणूस हा
चारलोकी गाजणारी राहिली ख्याती कुठे?


जाहला आवाज मोठा वाढतो बीपी अता
वादळाला झेलणारी राहिली छाती कुठे?

तोडली सारीच झाडी पावसा धरबंध ना
पेरले ते उबविणारी राहिली माती कुठे?



- बबन धुमाळ
आळेगाव (पुणे)

अक्षरचित्र-विष्णू थोरे


तमाम कवींनो ...
नांगर मारणाऱ्या
बापाच्या हाताखाली असतं रूमणं
बापाने लावलेल्या ऊसाला
फुटतात भाले
खांद्यावर कुऱ्हाड घेवून
बाप सवाळत असतो झाड
कुदळ घेऊन हाती
बाप खणत असतो बांध
सोशीक बापाला
आता ह्या हत्यारांची
जाणीव करून द्यायची वेळ आलीय
तमाम कवींनो ...
चला आता कामाला लागू
चला आता कामाला लागू
- बालाजी मदन इंगळे
संपर्क- ९८८१८२३८३३
चित्र-विष्णू थोरे



बैल आभाळाची कृपा
बैल धरतीचा जप
काळ्या मातीची पुण्याई
बैल फळलेले तप
बैल चंद्राचा वंशज
बैल सूर्याचा वारस
बैल माझ्या गोठ्यातील
पिढ्यापिढ्यांचा प्रकाश
बैल घामाची प्रतिमा
बैल श्रमाचे प्रतिक
बैल माझ्या शिवारात
काढी हिरवे स्वस्तिक
विठ्ठल वाघ
अक्षर-शिव डोईजोडे
चित्र-विष्णू थोरे

# मी मरेन तेव्हा...

मी मरेन तेव्हा
माझ्या नावावर असेल
मुख्यमंत्री कोट्यातून मिळालेला फ्लॅट
माझे रिकामे असलेले बॅंक बुक, क्रेडिट कार्ड
पुस्तकांनी भरलेली कपाटे
नुकतीच लिहिलेली एखाद दुसरी
अप्रकाशित कविता
काही मेडल्स
कोपऱ्यात पडून राहिलेली
सिगारेटची थोटके
माझे जुने पुराणे फोटो
माझ्या वापरातल्या वस्तू
भिंतीवर लटकलेला असेन हसू आणलेला फोटो
माझी दोन गोजिरवाणी मुले
मुलांसाठी काही करून ठेवले नाही म्हणून
आदळ आपट करणारी बायको
माझे असंख्य जिगरी यार, दोस्त, मैत्रिणी
आणि अनादी काळापासून चालत आलेली
ही पृथ्वी, हे ब्रम्हांड.


मी मेल्यानंतर तसुभरही
फरक पडणार नाही जीवनचक्रात
हे रहाट गाडगे असेच चालू राहील
बिनबोभाट
माझ्या संदर्भातील कडू गोड आठवणीही
पुसून जातील काळाच्या ओघात
हळू हळू मी पुसला जाईल प्रत्येकाच्या स्मृतीतून
माझ्या सज्जनपणाच्या शपथा घेणारे
माझे यार दोस्त अन्
एक चूक कायम लक्षात ठेवून
माझ्या संपूर्ण जगण्याचे
पोस्टमार्टम करणारे 'हितचिंतक'
यांच्या मोबाईलच्या फ्रेंडलिस्ट मधूनही
बावळट आणि फाटका होता एक माणूस
म्हणून बरा होता'
इतके मात्र निश्चित म्हणतील सर्वजण

मी मरेन तेव्हा
एका क्षणात नामकरण होऊन
भगवान निळेचे नाव 'बॉडी' झालेले असेल

**- भगवान निळे, मुंबई**



अक्षरचित्र-विष्णू थोरे



जवळचा मित्र मेल्यानंतर...
जवळचा मित्र मेल्यानंतर
त्याचा नं डिलीट करावासा वाटत नाही
तसाच जपून ठेवतो आपण...
तो नं डायल करावासा वाटतो
पण भिती वाटते
पलिकडून कोण बोलेल
किंवा कुणी बोलले तर
आपण काय बोलावे..?
मग काय काळजात फिड केले होते का त्याला?
ओठ हे काळजाचे मित्र असतात
हे माणसे निघून गेल्यावर कळते
बोललो नव्हतोच आपण त्याच्याशी
काळजाची भाषा
हे नंतर कळते
मग त्याचा मोबाईल नंबर
खुपच जवळचा वाटू लागतो
जसा की..स्वत:च्या रक्ताचा वास
डिलीट नावाची भाषा माणसांना समजली
मग त्या बटणाकडे
का जात नाही आपले बोट
किंवा श्रध्दांजली वाहताना
आपण का कॉपी करतो
इतरांचे
थरथरणारे हात..?
- भरत दौंडकर
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# कळलंच नाही

# वर्गातल्या मुली कुठं गेल्या...

कळलंच नाही
वर्गातल्या मुली कुठं गेल्या

सीगी, मंगी, कपी, मंदी
हसायच्या फिदी फिदी
आणखीही बऱ्याच होत्या वर्गात
कळायचंच नाही
आम्ही वर्गात आहोत की स्वर्गात.
खेळायच्या, बडबडायच्या,
बागडायच्या, नाचायच्या
म्हणलं तर खूप अल्लड होत्या
त्या फ्रॉक, पोल्के
चापून चोपून घातलेल्या वेण्यासकट
डोळ्यासमोरून तरळून गेल्या...
कळलंच नाही
वर्गातल्या मुली कुठं गेल्या

आम्ही शेण पाणी आणायचो
त्या वर्ग सारवायच्या
शाळा सुटल्यावर
वर्गही त्याच आवरायच्या
आम्ही वर्ग झाडायचो,
त्या बस्कर घालायच्या
आम्ही पटांगण झाडायचो
त्या सडा मारायच्या
त्या लंगडी लंगडी खेळायच्या
झिम्माड फुगडी घालायच्या
सर्वांशीच मनमोकळं बोलायच्या
अभ्यास तर मन लावून करायच्या

सातवी पर्यंत गावातल्या गावात
त्या आमच्या बरोबर शिकल्या...
कळलंच नाही
वर्गातल्या मुली कुठं गेल्या
सातवी नंतर घरात
असा काही नियम नव्हता
बाहेर गावी मुलींना
कोणीच पाठवत नव्हता
शाळा सुटली पाटी फुटली
मुली बसल्या घरात
आम्ही ढिवरे चिरंजीव
शिकत राहिलो शहरात




अल्पवयातच त्या बोहल्यावर चढल्या...
कळलंच नाही
वर्गातल्या मुली कुठं गेल्या

मिसरूड फुटायच्या आतच
आम्ही मामा झालो, काका झालो
त्या आई झाल्या, मावशी झाल्या
काकू झाल्या, सून झाल्या
नणंद झाल्या, भावजयी झाल्या
विहिरीवर पाण्याला गेल्या
रानात गेल्या, वनात गेल्या
काही चुलीवर गेल्या
काही स्टोव्हवर गेल्या
काही शेगडीवर गेल्या
काही परत आल्याच नाही
काही परतल्या
पण पार करपल्या
जळालेल्या भाकरीसारख्या...

व्यवस्थेच्या चरकात पिळल्या गेल्या...
कळलंच नाही
वर्गातल्या मुली कुठं गेल्या

त्या जिजाऊ होत्या
त्यांना एकही शहाजी भेटला नाही
त्या सावित्री होत्या,
पण एकही फुले भेटला नाही
त्या कस्तुरबा होत्या
एकही गांधी भेटला नाही
कुणी म्हणतात,
त्या परक्याचं धन झाल्या
कुणी म्हणत,
निर्माल्य होऊन जीवन गंगेत
वाहून गेल्या....
मला वाटतं
त्या नविन प्रकारे सती गेल्या
काही असो
त्या आता दिसेनाश्या झाल्या...
कळलंच नाही
वर्गातल्या मुली कुठं गेल्या

- भीमराव कोते-पाटील

अक्षरचित्र-विष्णू थोरे

# गोची



बाभळीच्या फुलावाणी
तुझा उजळला रंग
डवरल्या चिंचेवाणी
तुझं बहरलं अंग

ढेकळात उगवावी
गर्द हिरवी हरळ
माझ्या कोरड्या मनाला
तशी पडली भुरळ

हिरव्या रानाचा मी राघू
ओठ माझे लाललाल
तुझ्या डाळींबी ओठांनी
केली सारी गं कमाल

एकटीनं आडरानी
असा सोडू नये खोपा
सखे सुगरण बाई
इथं जागोजागी धोका

मृग कोसळला रानी
सारं शिवार भिजलं
तुझ्या प्रीतीचं बियाणं
माझ्या मनात रुजलं

एका थेंबासाठी केल्या
खुल्या चातकांनी चोची
चिंब भिजल्या देहाला
अंग झाकायची गोची

**भीमराव कोते**
नाशिक

अक्षरचित्र-विष्णू थोरे


चांदीच्या चांदण्या...
कपाशीच्या शेतामधी
वाटे दिसालाही रात
हिरव्या पानांचा काळोख
आणि चांदण्या बोंडात
बोंड ठलता झाडाले
येई कपाचा बहर
जशी नटली नवरी
कोण्या पाटलाची पोर
कशा चांदीच्या चांदण्या
लुकलुकती शेतात
सोनाराले इच्यारतो
देव दागीण्याची जात
आसं आगळं येगळं
धन काया नावराचं
मोल फिकं फिकं वाटे
सोन्या चांदीच्या घराचं
-गो. शि. म्हसकर
नगरदेवळा (पाचोरा)
९८६०१६७६६२
अक्षरचित्र-विष्णू थोरे




दिस मावळला तरी
माती आभाळ बनते
स्वप्न उशाशी बांधून
एक जगणे उरते

जगण्याची रीत अशी
इथे उतरे अंगणी
जगी शोधता-शोधता
पाणी सापडे रांजणी

येता जात्यावर ओवी
तिचे दुःख पाझरते
सारे आयुष्य दळता
कुठे माऊली भेटते

प्रारब्धाच्या अशा रेषा
काही बोलतात पाप
झाले जगून तरीही
लोक म्हणतात थाप

- चंद्रकांत पोतदार
कोल्हापूर
संपर्क - ९४२३२८६४७९


# चंद्रस्पर्श




मूठभर चांदणं देऊन
तो मला म्हणाला,
'यातच तू साजरी कर
तुझी पौर्णिमा वगैरे
आणि गात राहा
नक्षत्रांची गाणी अहर्निश.'

पण वेड्याला हे कळलं नाही,
काजळकाळया रात्रीचं
देखणेपण उमलण्यासाठी
तिला हवा असतो
फक्त चंद्रस्पर्श
स्नेहल,शीतल,आश्वासक.

-गौरी भोगले
कोल्हापूर


चिमणे...
चिमणे...
तू चिमणीच बनून राहतेस
आयुष्यभर...
चोचीतला अर्धा घासही नसतो तुझा
अन् त्यासाठी अर्धा जीव पंखांत पकडून
घेतलेली भरारीही
नसतेच कधी स्वतःसाठी...
क्षितीजपार भिरभिरणारी
तुझी निरागस नजर
दुवल्याशा पापण्यांती
शाकारत राहते घरट्याला.
चिमणे...
तू चिमणीच बनून राहतेस
आयुष्यभर...
पालथं घालतेस अख्खं आयुष्य
आभाळभर
हे आभाळ आपलंच आहे
या समजूतीवर...
चिमणे...
खरंच हे संपूर्ण आभाळ तुझंच होईल का
आयुष्यभर
- आनंद लोकरे
मंगळवेढा.
अक्षरचित्र- विष्णू थोरे

# माणसागत वागणाऱ्याचं

माणसागत वागणाऱ्याचं
जनता आपोआप नाव घेते
त्याच्यासाठी दुश्मनाचे
छातीवरती घाव घेते

माणसागत वागणाराच्या
शब्दास सोन्याची किंमत येते
ते रुजले की वादळाशीही
झुंजण्याची हिम्मत येते

माणसागत वागणाऱ्याचं घर
मंदिर- मस्जिद होऊन जातं
तिथं माथा टेकवण्यासाठी
सगळं जग धावून येतं

-डी. के. शेख

उस्मानाबाद
९५५२८४३३६५



अक्षरचित्र-विष्णू थोरे



# डंका

वंचितांच्या आयुष्याची वाटमारी फार झाली
पेरलेली चार दाणी पांभरीला भार झाली

चालतांना वाट माझी मीच होतो माळमाथा
घाव सारे सोसतांना ना कधीही हार झाली

का धरावी लोचनांनी आस आता मोरपंखी
आतल्या वेदनांची जीवघेणी धार झाली

मांडले मी दुःख माझे बोललोही खूप काही
ही कथांची रोषणाई लेखणीची यार झाली
मांडला बाजार ज्यांनी तेच देताहेत डंका
या मतांच्या घोषणांनी लोकशाही ठार झाली

-विष्णू थोरे, चांदवड.


अंतिम मीरा
घननितळ सावळकाया
डोहातील कातळछाया
हे जगणे कृष्णघनाचे
की उत्कट मृत्युछाया...
घुमणारा वेणूमधला
तो सुरावटींचा खेळ
की उदास डोहतळाची
घनसावळ संध्याकाळ...
ती अबोल काजळवेळ
झुरणारा पाऊसवारा
आभाळकवेची आस
ती आदिम- अंतिम मीरा...
- दत्ता पाटील, नाशिक
९९२२७६२७७७
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# तुझ्या झंकार पायात...



तुझ्या झंकार पायात
वाट चुकलेले रान
बांधावरल्या बाभळी
घेती पदर लावून


गंध केतकीचा ओला
तुझ्या चोळीला गं आला
पिंगे मोकाट पाखरू
पंख फुटले देहाला

टच्च दाण्यात कणीस
त्याला तोलवेना भार
बघे पानातून राघू
दिठी पेरलेली नार

काया तरणीबांड ही
पाय घसरून गेली
माखे चिकणी हळद
काळ्या डोहात न्हालेली

- देविदास चौधरी
कुंदलगाव.

अक्षरचित्र-विष्णू थोरे


घुंदी
अशी आलीस रानात
देही चांदणं सजलं
तुझा यौवनाचा भार
मन पाहून भुललं

पडे अंगावर ऊन
तुझी काया चकाकते
बघूनिया वावरात
लाजे जवारीचे पाते

वेडं झालंया हे रान
तुला शिवारी बघून
झाली बेभान पाखरं
गेली घरटे सोडून

झाला पाऊस अधीर
बरसला सरसर
ओलाचिंब तुझा देह
थरथरे वाऱ्यावर

देना माझ्या हाती हात
चल जावू दोघे घरी
तुझ्या रूपानं भरली
धुंदी साऱ्या या शिवारी

- ज्ञानेश्वर भामरे
वाघाडी ता. शिरपूर
जि. धुळे.
७२४९५९०९७४
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# कनात

हुरहुरत्या सांजेला
तुझी काजळी किनार
किण किणता चांदवा
होई डुल हळुवार

सावरत्या पदराला
वारा छेडतो नव्याने
उतरले रातराणी
रोमारोमात थव्याने



रुणझुण रुणझुण
पायी पैंजण सजते
तुझ्या ओठातले गाणे
माझ्या ओठात रुजले

गुलमोहर प्रीतीचा
जिंदगाणीच्या उन्हात
मरणाच्या मांडवाला
तुझ्या डोळ्यांची कनात

- कृपेश महाजन
मो. ९५७९८२७००७

# दुर्बोध संन्यासी

तू गूढ रम्य संन्यासी
मी कविता आरस्पानी
मौनातून तुझिया गाते
अस्वस्थ कसनुशी गाणी

तू दुरून घालिशी हाक
काळीज दुभंगे माझे
मी वाऱ्यांवर निघाले
हा पदर उगाचच लाजे

वेढू कसा मनभवती
घनघोर जटासंहार ?
तव जटातून तू हसशी
भेदून गगन हळुवार


कोणास कबुली द्यावी ?
कसला भलता ध्यास ?
उकलीत बसावे गुंते
मौनाचे अवघड श्वास

सख्या निघोनी जाऊ
शब्दांच्या पार पल्याड
प्रश्नांची निमते दिवटी
प्रेमाची रात निबीड




संकलन-विष्णू थोरे

- योगिनी राऊळ
मुंबई


माय मराठी
कधी तुक्याची अभंगवाणी
ज्ञानेशाची ओवी गं
माय मराठी बहुरसवंती
अक्षर अमृत बोली गं !
मराठवाडी कधी वऱ्हाडी
अहिराणीचा मेवा गं
कधी कोकणी मालवणीची
तोरा कालीन ठेवा गं !
कितीक भाषा आल्या गेल्या
फरक तरी ना पडला गं
झरा असा हा मायबोलीचा
मुळी कधी ना अडला गं !
लोकवाणी ही माय मराठी
सुखे नांदते जगतात
कौतुक होते जरी परकीचे
माय माऊली हृदयात
- दुर्गेश सोनार
९९२०७०४११३
अक्षरचित्र-विष्णू थोरे


एक थेंब
मनाची खपली
अलवार बाजुला करत
स्वप्नाचं एक रक्तबीज
केव्हा बाहेर पडलं
कुणास ठाऊक...?
पण आता
कैक पटीनं वाढताहेत
ही रक्तबीजं...
बेमालुम मिसळून गेली आहेत ती
माझ्यामध्ये
आणि
व्हायरल होतील ती हळुहळु
तुझ्यापर्यंत...
तेव्हा
तुझ्यातील रक्तबीजाचा
एकच थेंब
माझ्या नावावर कर
- ज्योती कदम
नांदेड


एकाएकी...
असे कसे हे विपरित घडले एकाएकी
आसपासचे लोक बदलले एकाएकी
काबूमध्ये आली आहे असे वाटले
पण आगीचे डोंब उसळले एकाएकी
दुःखांना तर हजार वाटा जाण्यासाठी
पण माझे घर त्यांना दिसले एकाएकी
हवेत विरहत होतो मी मस्तीत येथल्या
नियतीने का पंख कापले एकाएकी
पुर्णत्वाला आले होते घर पत्यांचे
आणि नेमके वादळ सुटले एकाएकी
सांत्वन करण्यासाठी आले होते सारे
माझ्यावर ते हसू लागले एकाएकी
सजवत होतो स्वप्न किती मी आनंदाने
पण स्वप्नांनी दूर ढकलले एकाएकी
किती दुरावा केला आहे आज सुखांनो
कुःख जवळचे मला वाटले एकाएकी
- शेखर गिरी
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# गावची जत्रा....


गावची जत्रा जवळ आली की
सरकन काटा येतो अंगावर
किती लावावे बेगड
परिस्थितीने तासलेल्या शिंगावर !

देवळाच्या भिंती रंगत राहतात
स्वप्नामागून स्वप्न भंगत जातात
आयुष्याचा पाळणा नुसताच
वर-खाली फिरत राहतो
कुणाचा तरी कोवळा जीव
पाच रुपयाच्या फुग्यासाठी
आतल्या आत झुरत राहतो !

मनातला गुलमोहर
फुलत नाही फळत नाही
कितीदा द्यावी जगण्याला च्यावी
आयुष्यभर कळत नाही !

अरे, आयुष्याचाच तमाशा झाला
तिथे जत्रेतल्या तमाशाच काय
पोटात अंधार दडवून
सांगा कसे थिरकतील पाय !

जत्रेच्या हंगामी लखलखाटात
उजळून निघतो आख्खा गाव
अन् हातातला फुगा फुटावा तसा
होतो स्वप्नांचा लिलाव !



अक्षरचित्र-विष्णू थोरे

- दिनेश आदलिंग
९४२३०९२४०८

# गांधी

आपल्या आत किती गांधी
काळ बदलतो गांधी बदलतो

मी महात्मा गांधी
माझा आत्मा गांधी
गांधी पंत आहे
गांधी संत आहे

गांधी चातुर्वण्य मानणारा
गांधी कट्टर पंथी

गांधी फाळणीवाला
पंचावन्न कोटीचा दलाल

गांधी दंगेखोर दंगे थोपवणारा
गांधी निःशस्त्र क्रांतीकारक

नथुराम गोडसेचा गांधी
संघस्थानावर प्रतः स्मरणीय गांधी

गांधी खेड्याकडे चला वाला
गांधी झाडूवाला स्वच्छतादूत

गांधी अस्पृश्यता कलंक मानणारा
गांधी अस्पृश्यांविरोधी करार करणारा

शेळीचं दुध पिणारा गांधी
टोप्या घालणारा गांधी

सत्याचे प्रयोगवाला गांधी
सत्तेचे प्रयोगवाला गांधी

गांधी हातात, मुठीत
गांधी कमळाच्या पाकळ्यात

नोटवाला गांधी
कोटवाला गांधी
गांधी वर्णाश्रमधर्मी
गांधी निधर्मी
गांधी बनिया
गांधी हेकेखोर

गांधी कम्युनिस्ट
गांधी सोशालिस्ट

हे राम!
गांधी कुणीही नाही
गांधी काहीही नाही
गांधी सर्वकाही
सर्व व्यापी

आपल्या आत किती किती गांधी
तारलेले-मारलेले-भारलेले

वध करूनही
गांधी मरतही नाही
गांधी सरतही नाही

-प्रा. डॉ. शंकर बोऱ्हाडे
नाशिक



अक्षरचित्र-विष्णू थोरे

# गावाला सोबत घेऊन जाताना...




गावाला सोबत घेऊन जाताना
अवघडत जातात हातपाय
खांदयावर जड होते ओझे
आणि मनावर प्रचंड ताण

गाव सोपे नाही वाहून न्यायला
शहरातल्या भयंकर गर्दीत
कितीही गुदमरला जीव
तरीही कडेवर लोंबकळून
चिकटून बसतेच गाव

शहराच्या अधाशी वास्तवात
गावातला पाऊस हद्दपार
खुरसटलेली बोन्साय मनं
गावाच्या आभाळात
सांधून घेता घेता
जीव मेटाकुटीस येतो
शहराशी लढता लढता
ढासळत जातं बुरूजासारखं
गावातलं बळ

अक्षरचित्र-विष्णू थोरे

- गणेश मरकड, सावेडी
अहमदनगर
संपर्क - ८२७५४७०२९४



गाथासप्तपदी
असा पारधीचा खेळ
पडे सावना भुरळ
रंगपंचमीचा सण
होळी खेळण्याची वेळ
रंग लाठर देहाची
जाते तापल्या मुशीत
ओल मार्दवाची खोल
फुले सृजनाची वेल
सात पाऊलांची साथ
उभ्या जन्माची वरात
तुझ्या माझ्या नशीबांचे
धागे गुंतत जातात
निरगाठी रेशमाच्या
कशी करावी उकल
धागे तोडावे तरीही
राहे उरामध्ये सल
भाळावर कोरलेला
सटवाईचा आलेख
अट्टाहास आयुष्याचा
सुख शोधण्यात सुख
- डॉ. राजेंद्र मलोसे
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# स्त्री एक शिल्पकार

अत्याचारी दुनियेत होता,अमानुषपणे बलात्कार
दाखव तू ही सखी आता,कालिकेचा रौद्रावतार..॥१॥

नाहीस तू गं अभागी,नाहीस तू गं ललना
स्त्रीपुरूषाची कायद्याने,समान आता तुलना ...॥२॥

सोडून पाश बंधनाचे, तुला जगावे लागेल
कधीतरी तुला देखिल कठोर व्हावे लागेल ....॥३॥

तुझ्याच उदरातून झाली,सुंदर विश्वाची निर्मिती
प्रबोधिनींच्या मशालीने,घडविली समाज क्रांती...॥४॥

याच क्रांतीतून पेटाव्या,शिक्षणाच्या ज्ञानज्योती
तेव्हाच होईल नारीची,अत्याचारातून मुक्ती ...॥५॥

पेटलेल्या लखलखत्या,ज्योतीची आहेस तू गं वात
अन्याय अत्याचारावर,तुला करायची आहे मात...॥६॥


नको कुणाचा आसरा,नको कुणाचा आधार
तुच आहेस जीवनाची,खरी स्त्री एक शिल्पकार ॥७॥




-सौ.गायत्री सोनजे
नाशिक.


अक्षरचित्र-विष्णू थोरे



माय माती...
माय सोसते वादळे
जीव आटापिटा करी
बीज अंकुरता पोटी
मिळे जन्माची भाकरी
अवकाळी मेघराजा
तिचे बीज नासवतो
तिच्या अवकाळी कळा
जीव तिचा हंबरतो
वखरली काळी आई
मळा नवा फुलवाया
मेघराजा बरस रे
आई करी गयावया
येता पावसाच्या सरी
तिचे गर्भार डोहाळे
तिचा आनंद मावेना
भरे पिकांचे सोहळे
माय मातीचा सुवास
पसरतो रानोरानी
माय आमुचा जिव्हाळा
तिची सदा गाऊ गाणी
- गीता देव्हारे-रायपूरे
चंद्रपूर
अक्षरचित्र-विष्णू थोरे




धाक
धाक
मौनातल्या होकाराला
झाले वादळ फितूर
कच्चं काळ्या आभाळाचं
उठे मनात काहूर
कुठे सजला प्रारंभ
कुठे थांबला अंत
काळाचे हे दीर्घ पाणी
कसे वाहतसे संथ
अनंताच्या झाडाखाली
लाख सांडले चांदणे
मला तुला जमले ना
प्रारब्धाला थांबविणे
पुन्हा दाटले वादळ
त्याचा फिरवून रोख
परतीच्या वळीवाला
तुझ्या डोळ्यांचा गं धाक
• गुरुदेव गांगुर्डे
पाटे, ता. चांदवड.
९४२३१०३९४६
धाक
अक्षरचित्र-विष्णू थोरे


आले कुठून पाणी
आले कुठून पाणी
धरणाला कळले नाही
अन् पाणोठयावर मरणे
हरणाला टळले नाही...
जनाईने कांडली ओवी
विठ्ठलाने दळले काही
जीवदान कुणाला द्यावे
कर्णाला कळले नाही
हा लाकूडफाटा सारा
का वाकून वाकून जातो
ही तिर्डी इथे कुणाची
सरणाला कळले नाही
शब्दांच्या इंद्रधनुला
त्या दिशा बिलगल्या दाही
मी अमर होऊन गेलो
मरणाला कळले नाही
- हनुमंत चांदगुडे
सुपे, बारामती
vishnuthore@gmail.com


हर लेकीच्या नशिबी...
हर लेकीच्या नशिबी
देवा दे रे आजीपण
आजीपणात फिटते
तिच्या आयुष्याचे ऋण
हर लेकीच्या नाशिबी
देवा दे रे आजीपण
आजीपणानं घराचा
वंश वाढतो जोमानं
हर लेकीच्या नशिबी
देवा दे रे आजीपण
आजी नातवांच्यासाठी
जणू अजिंठ्याचं लेणं
हर लेकीच्या नशिबी
देवा दे रे आजीपण
डोळे मिटताना तिच्या
नसे उरी सलसल
हर लेकीच्या नशीबी
देवा दे रे आजीपण
तुला आयुष्यात माझं
फक्त एवढं मागणं ...
अक्षरचित्र-विष्णू थोरे
- हरिष हालवटे
देवी निमगाव (बीड)
९४२१४२७५६३८


पापण काठावरती जेव्हा भरून येते कोणी
सुंदरसे मग अंतरातुनी सजून येते कोणी
आठवणींच्या हिंदोळयावर मन एकाकी झुलते
आठवणींच्या हिंदोळयावर बसून येते कोणी
किती लाघवी गूज चालते नजरचे नजरेशी
डोळयामधुनी अंतरात मग फिरून येते कोणी
शतजन्माच्या मरूभूमीवर फूल जसे उमलावे
जगणे आनंदाने भरण्या फुलून येते कोणी
बिरबल तुझी 'दूरचा दिवा' गोष्ट वाचली आहे
तशीच माझी उर्जा बनुनी दुरून येते कोणी
किती गोड हा भास मला "हेमंत" लाभला आहे
माझ्यासाठी स्वतःशी जसे हरून येते कोणी
- हेमंत जाधव, पाचोरा.


हिरकणी
लक्ष नसते फाईल मध्ये वेळ कैकदा पहात असते
संध्याकाळी बाळासाठी एक हिरकणी धावत असते
रोज पहाटे पाळणाघरी दगड होऊन सोडते
त्याच्याही डोळयातला पान्हा उभा आडवा खोडते
माय नावाची एक पणती त्या चेहऱ्यावर तेवत असते...
ती करते सह्या त्या ही बाळासारख्या दिसतात
हजर असून प्रत्येक आया ऑफीस मध्ये नसतात
दुपारच्याही घासावरती बाळ पहारा ठेवत असते...
बघता बघता दुपार होते बघता बघता पाच
साहेबाला म्हणते मग ती अरे वेंधळया डोळे वाच
वाट लाभते पायांना अन् ती गाडीतही मावत नसते...
इवली इवली नाजूक बोटं लाल चुटूक हसरे ओठ
बाळ पीतं दुध आणि या वेडीचं भरतं पोट...
उरी दाटतो कान्हा लोंढा अन् ही वेडी वाहत असते...
संध्याकाळी ठरल्यावेळी मुसळधार भेट होते
साचलेलं इंधन आतल्या आत पेट घेते
थकलेली रडवेली मैना झाड गळयाशी लावत असते...
- डॉ. विनायक पवार, नांदेड
९७६७४६०१३४
अक्षरचित्र-विष्णू थोरे




# स्पेस...


मला या घरात मिळतच नाही स्पेस
मी हरवून बसले माझी मोकळीक
पोरं सांभाळत म्हणत
घर डोक्यावर घेत असते
रोज बायको...

माझ्या स्वप्नांना पंख फुटूच देत नाही
या घरात कुणी
मिळतच नाही मला मोकळे आकाश
स्पेसच नाही काही म्हणत
बेजबाबदीने खांदे उडवत जातो मुलगा...

आपल्याला चार भिंतीत घराच्या
रेंज नाही म्हणत
प्रियकराशी बोलण्यासाठी मिळावी स्पेस
म्हणून अंगणात तासनतास
मोबाईलवर बोलत असते मुलगी

आणि....
सर्वांना स्पेस देतांना
मी माझीच स्पेस हरवत बसलेला....

-इरफान शेख
चंद्रपूर


वारी पंढरीची...
नाम विठ्ठलाचे मंत्र संजीवन
वारी पंढरीची आनंद-निधान ॥
कैवल्याचे धाम चंद्रभागे तीरी
महापुण्यराशी विठ्ठलाच्या दारी
छाया विठ्ठलाची शितल चंदन ।
घालुनिया गळा तुळशीच्या माळा
आषाढीस फूले सावळ्याचा मळा
नामा, तुका-चोखा संताचे दर्शन ।
वेदना आमुच्या विठ्ठल सोसतो
काटे संकटांचे वेचूनिया घेतो
दिलासा आम्हांस पांडूरंग ध्यान ।
दया दातृत्वाचे प्रमाण विठ्ठल
राम-कृष्ण-हरी विचार निर्मल
संकल्प सिद्धीचे विठ्ठल साधन ।
प्रेरणा विठ्ठल धाम चैतन्याचे
माऊली विठाई झाड आनंदाचे
हरी किर्तनात रंगावे जीवन ।
विठू माय-तात कर्ता करविता
दिले सर्व काही काय मागू आता ?
विठ्ठला चरणी लीन जनार्दन ।
- जनार्दन देवरे
मनमाड.
अक्षरचित्र-विष्णु थोरे

# लई जंतर, हा मंतर





लई जंतर, हा मंतर
तुझ्या नजरेची हवा
मुकी मौनाची पाखरं
मनी बिथरला थवा

वढ लागली, रात जागली
कूस बेचैन पाहुणी
कुण्या मुलखाचा चंद्र
गेला उजेड फेकुनी
सांज उरात कळली
सूर गवसला नवा...
मुकी मौनाची पाखरं..

काट्या कुपाटीचं जीणं
कशी करावी राखण
डोळं पारध झालेलं
रूप सलतं देखणं
तू गं दिलाची या राधा
केला काळजाचा पावा...
मुकी मौनाची पाखरं...

- विष्णू थोरे
-चांदवड


मन मनाला
मन मनाला किती नागवी सारखे
ओठ दिसती तुझे काकवी सारखे
तीच वेणी पुन्हा आज विनली सखे
वय पुन्हा वाटले आठवी सारखे
छाटतो रोज मी अडचणींची मुळे
प्रश्न फुटती पुन्हा पालवी सारखे
वागणेही तुझे वाटते बेगडी
बोलणे..सारवा सारवी सारखे
जन्मभर पोसल्या लाख शंका जरी
प्रेम केले तिने यादवी सारखे
- जयदिप विघ्ने
देऊळगाव राजा
अक्षरचित्र-विष्णू थोरे



यायचे तर...
यायचे तर आडवळणी येत गेले
जात असता मात्र सुख रांगेत गेले
सडक दिसल्यावर रडाया लागला तो
जोडली रोहरे परंतू शेत गेले
कान माझे फुंकताना माय म्हटली
काल या वाटेवरूनी प्रेत गेले
एवढा विकलांग का झाला विरोधी
वाटते कोणी तुझे सत्तेत गेले
वाजवावा ढोल कैसा जिंदगीचा
दैव हाती खुळखुळा जर देत गेले
देह माझा भासतो भयभीत संसद
सत्र आयुष्या तुझे चर्चेत गेले
- जयदिप विघ्ने
देऊळगाव राजा
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# झाडांचं सनातन दुखणं



झाडांनो
किती ऋतू किती पक्षी
कितीतरी माणसं
येत गेली तुमच्याही सोबतीला
कुऱ्हाडीचे अमानुष बलत्कार
झालेच की तुमच्याही देहावर
तुम्ही का नाही जपले
कुठले घाव ?
एखादी जखम
ठसठसणारी...


कधीतरी तुम्हीही झालात विवस्त्र हातोहात
मग कुठला कृष्ण
तुम्हाला वस्त्र पुरवीत राहिला जन्मभर
का तुमचंही दुखणं सनातन?

झाडांनो,
संभोग शिल्पासारखी
तुमची मूळं घट्ट मातीशी
ऐन पानकळ्यातलं
तुमचं हिरवं गर्भारपण ...
कुठली सुईन तुमच्या कळाना
निभावून नेते अलवार
कळत नाही?

एक मात्र खरं
तुमच्या सावलीत
वाढत नाहीत तुमची पिल्लं
म्हणून बरंय!

— विष्णु थोरे

धूळपेरा उसवता -९३२५१९७७८१




माझ्या जगण्याचं बळ
तुझ्या डोळयांची करूणा
लाख दिव्यांचा महाल
आई तुझ्याविन सुना

आली फुलून फुलात
गंध लेवून मातीचा
ज्योत जळाली देव्हारी
जन्म घेऊन वातीचा
नाही मिळाली उसंत
तुझ्या राबल्या हातांना
उभी जिंदगी चालली
चिंध्या बांधून पायांना

कशी मागावी भाकर
भूक लागल्या तव्यानं
माय पेटते आतून
रोज जळते नव्यानं
जळताना देहभर
सा-या उजेडाच्या खुणा
बांध बांधून डोळयांना
माय उभी ताठ पुन्हा

उरी भुकेचा हंबर
दुःखं नशिबी आंदणं
तुझा लढण्याचा वसा
दारी सुखाचं नांदणं
स्वप्न डोळयात कोंडून
चाले जगण्याशी युध्द
तुझ्या घामाच्या थेंबात
मला दिसतोय बुध्द

चित्र-विष्णू थोरे

-जितेंद्र लाड

९९६७९२९९११

# काच नात्यांची

काच नात्यांची उभी तडकून गेल्यावर
हात आठवले तुझे निसटून गेल्यावर

सावले सोसून घे तापटपणा त्याचा
जग तुला पुसणार नाहि ऊन गेल्यावर

भूक मेल्यासारखी वाटायची थोडी
हात मायेने कुणी फिरवून गेल्यावर

प्रश्न हा इतका सरळ नव्हता फुलांचाहि
'कोण आठवले तुला येथून गेल्यावर ?'

मी पुन्हा नाहि मिठ्यांची मागणी केली
वीज डिवचेणी मला बिलगून गेल्यावर

एवढा उलटू नये ना हा काळ कोणावर
दार लावावे कुणी दारुन गेल्यावर



अक्षरचित्र-विष्णू थोरे

- जयदिप विघ्ने
देऊळगाव राजा

# पिकासारखं पोरींना...




पिकासारखं
पोरींना कसं जमतं

वाफ्यामध्ये उगवून
शेतभर पसरणं...

परकं घर
आपलंसं करताना
आपलं घर विसरणं

- कैलास सलादे
• चांदवड •
९९२१५२८४२१

अक्षरचित्र-विष्णू थोरे


दुःख भोगल्या क्षणांचे...
दुःख भोगल्या क्षणांचे
दिस मोजतो बोटांनी
वांझ सुखाचे हंगाम
दहा पांगले वाटांनी
उभा दुस्काळ दुस्काळ
काय करावं खळ्यात
पीक सोंगण्याआधीच
सुडी जळते डोळ्यात
तरी सुगीच्या दिसांचे
मनी बांधतो पाचुंदे
बी रुजाया काळजात
ओल थोडीशी साचू दे
- कैलास सलादे
चांदवड
९९२१५२८४२१
अक्षरचित्र-विष्णू थोरे



कासरा
झाली दुपार इरलव
वारा मातीच्या तापल्या
नको आडराणी थांबू
मावलाया वं कोपल्या
लई वंगाळ वखुत
दिस रेंगाळतो माथी
सांधीतल्या कणगीत
इचू काटयाची नं भीती
वढ जिवाची सांभाळ
गिळ थुक्यानं तहान
बाई वाढल्या वयात
पायी रुतते वहान
झाड झुडूपाच्या आड
वल्ला घावतो आसरा
स्पर्श सुखाचा चावट
त्याला लावावा कासरा
- विष्णु थोरे
चांदवड.

# खळं



चित्र-विष्णू थोरे

भर शेंगाच्या वावरी
चाले बापाचा कुळवं
गोण्या भराया खळयात
आला पाखरांचा गाव


तुझ्या बैलाची घुंगर
मुक्या संसाराचं गाणं
पोट टांगून झाडाला
चोची टिपतात दाणं

अशी टळते दुपार
बैल टाकती शिवळ
घास कोरडा रुतता
डोळं निरखी आभाळ

ताह्न मारून मडकी
झाडाझुडपा बांधली
गर्दी बापा भोवताली
तान्हेजल्या पाखरांची

राश भरू दे खळयात
हौस मळयाची फिटू दे
थवे रानी उतराया
पाणी तळयात साठू दे

- शंकर अभिमान कसबे
सुर्डी, ता. बार्शी
जि. सोलापूर


कथा
धावणाऱ्या या जीवांचा
रस्ता हा खुंटला
उतू येतो सांत्वनाला
पापण्यांचा कुंचला
अंगणाचा पारिजात
आजही खुणावतो
स्वप्नांच्या पाठीमागे
कोण वेडा धावतो
लाट येते ही सुगंधी
वाट होते पांगळी
खुडलेला स्पर्श हाती
रात होते वेंधळी
काळजाच्या काळजीची
सांग ना गं तू व्यथा
संपलेल्या कहाणीची
ऐकू दे ना मला कथा
- विष्णू थोरे
९३२५११७७८१

# पैंजण


ही कोण ओरडतेय
संस्कृतीच्या नावाने
गळे काढून
नि दाखवतेय बोट
गाभाऱ्याकडे
याच गाभाऱ्यातील
तथाकथित स्त्रियांनी
शिकवलंय आम्हाला
गाभाऱ्यात राहून
राज्य करायला
आमच्या सांस्कृतिक पैंजणांचा भार
नाही वाटत आम्हाला असह्य
आम्ही झेलू त्याला पिढ्यानुपिढ्या
नि नाचू त्याच्या तालावर
ताल धरून
हवं तर बदला तुम्ही स्वतःला
नि बसवा
आमच्या साच्यात
मग आपण मिळून
पुन्हा गाभाऱ्यात जाऊ
आपण मिळून
पुन्हा अंधारं पाहू
आपण मिळून पुन्हा
गुलाम होऊ




असं बेंबीच्या देठापासून
ओरडून सांगणाऱ्या
सुशिक्षित स्त्रियांना
कसं करावं मुक्त
संस्कृतीच्या पैंजणातून?


- कविता मोरवणकर

अक्षरचित्र-विष्णू थोरे


सरण
बाईपणात थिजून
तिनं झिजवली काया
दुःखं शेकवीत गेलं
सारी जिंदगानी वाया
आडामधी घसरून
जवा झाली सवाशीण
लाल कुकवाच्या खाली
जळे इस्तवाचं ऊन
हिर्वी काकण जोडवी
सडे हळदी कुंकवाचे
तिच्या मागून पेरती
सारे बीज जवसाचे
फुल पाकळ्यात देह
येळ गेल्यावं सजला
धगी मधल्या आगीत
तिचा जलम कुजला
जीतेपणी साठवलं
बाई मरणाला डोळा
लई काडीवाणी देह
त्याला हळुवार जाळा
-कविता कडलग/शिर्के
केंदुर, ता. शिरूर (पुणे)
अक्षरचित्र-विष्णू थोरे


संहिता
केशव सखाराम देशमुख
उघडं शिवार
कास्तकाराच्या काळजाला घरं पाडतं
गोठाभर अस्वस्थ करून उरणारं
हंबरणं
त्याच्या नरड्याखाली भाकरीचा घास
उतरणं मुश्कील करत
भरलेलं शिवार
घरातला उजळलेला दिवा
त्याच्या कपाळावरल्या रेषांची भाषा
शेणामुताचा वास
त्याच्यालेखी
राष्ट्रीय एकात्मता
अक्षर-शिवा डोईजोडे
चित्र-विष्णू थोरे


कसं जगायचं आम्ही?
तुम्ही वावर घेताय,
म्हणजे नुस्त वावर घेताय का?
वावर म्हणजे नुस्ती जमीन,
नुस्ती ढेंड नाही हो सरकार,
माझ्या कित्येक पिढ्यांचा भूगोलय, इतिहासय,
सगळी शास्त्रं, पुराणं सगळं सगळंय हे
दुर्बिनीनं नका बघू,
माझ्या नजरेनं बघाना नजरेच्या एका टप्प्यात
आख्खं वावर... मला गर्भाशयासारखं दिसतं मईच्या.
अन तुम्ही अचानक
सं
पा
द
न
करणार या आमच्या हजारो पिढ्यांच्या
ग
र्भा
श
या
चं?
-केशव खटींग
परभणी
अक्षरचित्र-विष्णू थोरे


किनारा
तुझ्या सोबतीचा किनारा मिळाला
मुक्या भावनांना निवारा मिळाला...
उरी झेलल्या कोरड्या वेदनांना
खरा आज थोडा पहारा मिळाला...
मनी जागल्या पाकळ्या आठवांच्या
रित्या ओंजळीला सहारा मिळाला..
तुझ्या सोबतीने फुलावी कळीका
जणू लोचनांना नजारा मिळाला...
हसू आणले रे नव्याने फुलाला
जगी चेतनांना उबारा मिळाला...
-सौ. कस्तुरी देवरूखकर
मुंबई
अक्षरचित्र-विष्णू थोरे


बाईच्या कविता...
भान हरपून
कार्टून मध्ये गुंग मुलीला
'नीट बैस'
म्हणते बाई
आणि चपापून
मुलगी खाली ओढते
मांड्यावर गेलेला फ्रॉक
फटकन जोडते
चुकल्यासारखे
फाकलेले अस्ताव्यस्त पाय.
लहान वयातच कळू लागतात मुलीला
आपले शेवाळी भाग
सवय होवू लागते
कुणाच्या तरी सततच्या
नियंत्रक नजरेची:
पालन कर्त्याच्या आज्ञेची
आणि कुठूनही येणाऱ्या
अनाहूत कॉमेंटची
- किरण येले, अंबरनाथ

# दूध खुळा नसतो कोणी

'शेती ही पिकविण्यासाठी असते,
विकण्यासाठी नाही'
हे न कळण्याइतपत
दूधखुळा नसतो कुणी!
तपातून तळपणाऱ्या
एखाद्या हंगामालाही
झाकोळून टाकतात कावळे
तेव्हा अंधारल्या घरात
करता येत नाही
पोरीचे हात पिवळे
सोईरपणातल्या
सौंदर्याचे सोहळे
साजरे करण्याचे
कर्तव्य पार पाडण्यासाठी
मनात काटा रुतवून
विकावी लागत असते शेती!
एऱ्हवी शरीरातल्या हरेक
धमणीत वाहणाऱ्या रक्ताच्या
थेंबाथेंबाला
हृदयही सांगत असते
ठोक्या-ठोक्या परत की,
शेती ही पिकविण्यासाठी असते,
विकण्यासाठी नाही!



-किशोर काळे

किन्ही ता. जामनेर

अक्षरचित्र-विष्णू थोरे

# ओठ



अक्षरचित्र-विष्णू थोरे

ओठ कापून देशील नात्यांचे
नुसते गर्द पिंगट होत जातील ओठ
त्यातून गळणार नाही रक्त
एक मधाचे पोळे लटकून खाली पडेल

नात्यांचा होईल सूर्योदय तुझ्या डोळ्यात
माझे ओठ जेव्हा अलगद फिरत असतील
तुझ्या बंद डोळ्यावरून
नको उघडूस
नातं वाहून जाईल
बघ मी हात ठेवलाय तुझ्या छातीवर
तुझी धडधड ऐकण्यासाठी नाही
माझ्या तळहातावरील रेषा
जिवंत करण्यासाठी

चल नवा अध्याय लिहू
प्रेमाचा नाही समर्पणाचा
जरा चाचपून पहा तुझे श्वास
जे उडी मारण्यास उत्सुक
माझ्या तीर्थालयात

हो मी आहे अथांग
पण कोपऱ्यात भेदरून फेकू नकोस श्वास
ते उभे आहेत डोहातल्या तळात
खोल खोल लाठ उभे पाय घट्ट रोवून
माझा प्रवाह वळवळणारे
आता ओठ कापून घे...

-किशोर पाठक
नाशिक



# कोरडे नक्षत्र

पाणी मागावे नभाला
नभ कोरडे कोरडे
डोई पोटावर भार
आणि घागरीला तडे


पाणी शोधता शोधता
जीव घाबरा होताना
गाईगुरांचा हंबर
सांज भरुन येताना

साऱ्या रानाचा उन्हाळा
दिस एकटा एकटा
पाणझऱ्याच्या वाटेला
पायी इस्वाराचा काटा


काटा गोंदून पायात
पोरी मागतात पाणी
येती ओठांवर आता
भिजपावसाची गाणी


प्रकाश होळकर


अक्षर-शिव डोईजोडे
चित्र-विष्णू थोरे


माती
जन्माआधी पोसे माता पुढे जन्मभर माती
एक नाळ तुटताच श्वास गुंफतात नाती
उभा जन्म गुंफताना किती ओवायाचे मोती
एक सर तुटताच सारी पांगतात नाती
कुणी किती कुणासाठी जपायाची नातीगोती
हरेकाच्या आयुष्याची शेवटाला होते माती
जन्मा येऊन हो जिणं जिणं जगावं वातीचं
ज्याच्या त्याच्यापरी त्यानं देणं फेडावं मातीचं
उंच उडावे आकाशी ठेवा मातीवर पाय
जन्मणाऱ्या प्रत्येकाची तीच बाप तीच माय
- लक्ष्मण महाडिक
पिंपळगाव बसवंत
अक्षरचित्र-विष्णू थोरे


माय
माय माझी सवसोती, संस्कारांचं गं भांडार
रेघ कोऱ्या पाटीवर, केलं जीवनाचं सार
देव कुठाले शोधता, मंदिरात भजनात
देव मले सापडला, माझ्या मायच्या रूपात
तिन तिर्थ चार धाम, माझ्या मायचं गं मुख
माय पुढे फिकं, साऱ्या जगातलं सुख
जीवनातला सुगंध, माय दारची तुळस
वसे माझ्या हिरदात, मायपणाचा कळस
घरच्या गं सुखासाठी, देह चंदन घसावा
खपते गं दिनरात, देत लेकरा विसावा
देह जाळत पोळत, ओला अंतरी जिव्हाळा
आसू डोळा झिरवत, पिके मायचा गं मळा
- लतिका चौधरी
दोंडाईचा, धुळे.
अक्षरचित्र-विष्णू थोरे


माय
माय माझी सरसोती, संस्काराचं गं भांडार
रेघ कोऱ्या पाटीवर, केलं जीवनाचं सार
देव कुशाले शोधला, मंदिरात भजनात
देव मले सापडला, माझ्या मायच्या रुपात
तिन तिर्थ चार धाम, माझ्या मायचं गं मुख
माय पुढे फिकं, साऱ्या जगातलं सुख
जीवनातला सुगंध, माय दारची तुळस
वसे माझ्या हिरदात, मायपणाचा कळस
घरच्या गं सुखासाठी, देह चंदन घसावा
खपते गं दिनरात, देत लेकरा विसावा
देह जाळत पोळत, ओला अंतरी जिव्हाळा
आसू डोळा जिरवत, पिके मायचा गं मळा
- लतिका चौधरी
दोंडाईचा, धुळे.
अक्षरचित्र-विष्णू थोरे


वही...
खेळ मांडलाय सारा
माणसाचा माणसाने
कुणासाठी लिहु काव्य
कुणासाठी गाऊ गाणे
वैरी झाले इथे सारे
जरी रगताची नाती
माणसाने माणसाला
दिली आता मुठमाती
नात्याचेही भान नाही
केलेल्याची जाण नाही
जन्म दिलेल्या लेकाला
नको वाटे आता आई
सारे झाले आता वैरी
फासे काळीमा घराला
सभ्यतेचे खोटे गाणे
साहय करती चोराला
नाही विचारत कोणी
नाही देत कुणा पाणी
स्वार्थ साधती हौसेने
किती मोठ्या आनंदानी
आता संपावे हे जीणे
नको असे उणे काही
अंधारात वाचते मी
तुझ्या सभ्यतेची वही
अक्षरचित्र-विष्णू थोरे
-लिना पवार, ठाणे.


सत्य
सत्य सर्वांचे आदी घर ॥
सर्व धर्मांचे माहेर ॥ धृ ॥
जगामाजीं सुख सारें ॥
खास सत्याची तीं पोरें ॥१॥
सत्य सुखाला आधार ॥
बाकी सर्व अंधकार ॥
आहे सत्याचा बा जोर ॥
काढी भंडाचा तो नीर ॥२॥
सत्य आहे ज्याचें मूळ ॥
करी धूर्तांची बा राळ ॥
बळ सत्याचे पाहुनी ॥
बहुरूपी जळे मनी ॥३॥
खरें सुख नरा नोव्हे ॥
सत्य ईशा वर्जू पाहे ॥
ज्योती प्रार्थी सर्व लोकां ॥
व्यर्थ डंभा पेटू नका ॥४॥
(महात्मा फुले समग्र वाङ्मय)
पृष्ठ- ४५७
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# काचपारवे

हिरव्या गोंदणरानी
काचपारवे झुरले
डोळ्यांच्या वाटेवरती
थेंबांचे घरटे ओले

सारा श्रावण सुकला
डोळ्यांत उभा वैशाख
थेंबाच्या ओल्या भाळी
वैरागीण होते राख

विरते अंशुक देही
दाटून खुणांचे डोह
दंश फुलांचे जहरी
ओठांवर अवरोह

काठ जरा सावरतो
घागर भरून घेता
पाण्यात सांडतो चंद्र
पहाट होता होता



- मानसी चिटणीस
पुणे

अक्षरचित्र-विष्णू थोरे

# मिसकाल

मिसकॉल कशाला देता ओ पाव्हणं
मिसकॉल कशाला देता....


मोबाईल आहे तुमचा स्क्रिनटच
जरा हळूच फिरवा बोटं
ऑनलाईन या माझ्याशी थेट
नुसतं खेळंतच काय हो बसता
ओ पाव्हणं...



नाजुक हाताने हँडसेट धरा
माझं अकाऊंट ओपन करा
तुमचा डाटा त्या मधे भरा
नुसत्या इमेजच काय ओ बघता
ओ पाव्हणं...

आता नका करू हो वेटींग
लाईफ टाईम करू हो सेटींग
फेसबुक वर करू चॅटींग
हँग असे कशापाई होता
ओ पाव्हणं...

- लक्ष्मण बारहाते
एरंडगाव, येवला


मोर
मोर
नाचत रहतो
बेधुंदपणे
आपल्याच तालात
नाचणारा मोर
पुढूनच पहावा
गळणारे डोळे मात्र
दुर्लक्षित.
आसवांतूनही
जन्म देण्याचं सामर्थ्य
शिकून घ्यावं
मोराकडूनच.
— नीलेश केदारी शेळके
गडहिंग्लज (कोल्हापूर )
९४२१११२४५५
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# अक्षरपेरणी



अक्षर-शिव डोईजोडे
चित्र-विष्णू थोरे

## ज्वारी


रानात होती तेव्हा
मस्त डोलत होती
खळ्यात आली तरीही
अजून स्वस्त होती

आडतीत जावून मात्र
अडकित्यात सापडली
गोदामांनी तर तिला
बिळात बुजवली

गोरगरिबांची भूक
तिच्यासाठी अडलेली
दुकानात येई पर्यंत
ती बिचारी किडलेली

नका विचारु तुम्ही
आता किड्यांचा पत्ता
तो सापडला तर
कोलमडेल ना सत्ता

— इंद्रजित भालेराव



मुलांनो...
सुट्या संपल्या पाऊस आला छान मुलांनो
हिरवे झाले शाळेचे मैदान मुलांनो
तुडवा चिखल गारा खेळा गोट्या भवऱ्या
अभ्यासाचे जरूर ठेवा भान मुलांनो
तुमच्या कोवळ्या पंखांना बळ देते शाळा
मस्तकात घ्या पुस्तकातले ज्ञान मुलांनो
शिका तुम्ही शिकवा दुसऱ्यांना शिक्षणसारे
उंचवेल मग तुमचे जिवनमान मुलांनो
आयुष्याला देती जे आकार नेटका
गुरूजनांचा करा आदर सन्मान मुलांनो
-गो. शि. म्हसकर
नगरदेवळा (पाचोरा)
९८६०१६७६६२
अक्षरचित्र-विष्णू थोरे


झेलाबाई माय
काळीज कापून माय तीळतीळ तुटायची
वाढवताना मला माय आपुलीच घटायची
उधाणल्या वादळात घुसमटे जसं झाड
गूळ सोवून मायेची माय दिस रेटायची
भाजता भाकरी उभं आयुष्य भाजलं
तवा झाल्या उन्हात माय साऊली वाटायची
सोडून पदर चाललो काट्याकुट्यातून
लागता ठेच माय रक्तातून भेटायची
मला अजून आठवे तिच्या कुशीतला गंध
देवळाचा दर्वळता माय गाभारा वाटायची
सासुरवाशा संसारात तिचा मीच विरंगुळा
होऊन खुळखुळा माय वाजायची फुटायची
अशी झेलाबाई माय माझी मला झेलायची
माझ्या सुखासाठी माय जीव कांडायची कुटायची
- नाना महाजन
मालेगांव
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# मन निळग...



मनाला फुटली हिरवी पानं.
डोळ्यात पेटलं आभाळ गाणं,
हिरव्या पानात आभाळ गाण्यात
जीवाचं पाखरू झालं हैराण ॥


वावटळीत दूर उडत जावं,
पाचोळा होऊन झुरत यावं,
मनाच्या हिरव्या वनातून
गोंदत जावं जीवन गाण ॥

आभाळ ओलं गर्भारलेलं,
ऊन-थेंबात पांगत गेलं,
झावळ्या झाडाच्या दाटीतून
भिजल्या पंखात थरथरे मन ॥

शालू चुडा हिरवा ओली साजणी,
आभाळ घाली हातानं वेणी,
हिरव्या रानाची सुगरण
कोवळ्या उन्हाचं तिला लिंपन ॥

अक्षरचित्र-विष्णू थोरे

-नारायण पुरी, औरंगाबाद
९७६६९३५९४०


न थकता पदराआड्न, कधी ओणव्या होऊन
कमरेला आलेली कळ दाबून, भुमीच्या गर्भात डोकावून
मायबहिणीशी बोलावं तसं हजारो बाया मातीशी बोलताहेत
माथ्यावर भरुन आलयं काळनिळं आभाळ
कोरड्याठाक दुष्काळी देहाचा आषाढ करून
बायाच बाया शेतीयुगापासून गवत निंदताहेत
एकेक पाथ निंदून व्हावी तसं धुतलेल मन
देहाला पदर आल्यापासून दरमहा ओला श्रावण
कित्येकीचा सरला श्रावण तरी बायका निंदताहेत
एकेक पाथ निंदून व्हावी तशी संपून जातात वर्ष
मातीखालची लव्हाळी, हराळी कुंधा कधीच मरत नाही
हाडामांसाची होते माती तरी निंदण सरत नाही
– श्रीकांत देशमुख
अक्षर-शिव डोईजोडे
चित्र-विष्णू थोरे



मंतरलेलं झाड
स्वप्नात तुझे ओठ
कपाळावर विसावतात
क्षणभर अगदी हळूवार
आणि सोनचाफ्याचा गंध
दरवळतो माझ्या अवती-भवती
मलाही टेकवावेसे वाटतात ओठ
पण
सोनचाफाच आवडतो
हळवे कातर नाजूक
नकार झेलणं
आणि तरीही
बहरून जाणं
मोहरून येणं
गंधाळणं अंतर्बाह्य
होतच राहतं
सोनचाफ्याचं
ते
मंतरलेलं झाड
तू माझ्या
अंतरंगातच लावलयस बहुतेक
- नीलिमा श्रुतिश्रवण
लातूर
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# हळवी स्वप्ने...



हळवी स्वप्ने मातीवरती रांगत नाही
म्हणून आता घरात घरपण नांदत नाही

उजेड देणारी ती झाडे विझून गेली
घरात आता आजी गोष्टी सांगत नाही

अंगणातल्या गुलबासाचे वारस मेले
कुंपणातली मेंदी आता लाजत नाही

स्वप्नांचा तर वेग वाढला खूप परंतु
धुळीतल्या रस्त्याहुन दमणी धावत नाही

जोतो येथे उघडा करतो ज्याला त्याला
पदराखाली कुणी कुणाला झाकत नाही

टिव्हीत नाचे जाहिरात भक्तीची आता
म्हणुन बिचारा विठू किर्तनी नाचत नाही

वेडी झाली दुनिया वेडे झालो आपण
फक्त धावतो क्षणभर कोणी थांबत नाही


अभिमानाची सूज एवढी वाढुन गेली
स्वतःच आपण स्वतःत आता मावत नाही


- नितीन देशमुख
अमरावती

अक्षरचित्र-विष्णू थोरे



पैंजणी पायांचं भय...
तिची नाजूक सुकोमल पाऊले
अनवट वाटवरून चालू लागल्यावर
प्रत्येकच काटा टरारून फुलला...
रक्तबंबाळ पायातून काढत राहिली ती
एकेक काटा अलवारपणे
पायताण घालून जायचं ठरविल्यावर
काटे होऊ लागलेत अधिकच टोकदार
टोचू लागलेत त्यातूनही आरपार!
डोळ्यात आसवं दाटली
उमटले वेदनेचे हुंकारही...
द्रवली नाहीत काट्यांची हृदये जराही!
ती विव्हळली, कळवळली, डळमळली
दुसऱ्याच क्षणी उभी राहिली निर्धाराने
घट्ट मनोन काढून फेकताच
उगा किणकिणणारी पैंजणे
पायच झाले मग राठ नि टणक!
नेमके टोकदार काटे शोधून
त्यावर पाऊले देत ती चालू लागली
तेव्हा काट्यांचीच पळापळ झाली!
हल्ली तिच्या पावलांची चाहूल लागताच
काट्यांच्याही अंगावर सरसरतो काटा...
निष्कंटक होत जातात तिच्या साऱ्या वाटा!
कधीतरी एका बेसावध क्षणी
तिला पैंजणांची आठवण होते...
माना मोडून पडलेल्या काट्यांमध्ये
तेव्हा पुन्हा घुगघुगी संचारू पाहते!
आता बाईला अनुभवाने
एक पक्कं कळलंय...
पैंजणी पायांनाच काट्यांचं अधिक भय असतं!
- हेमराज बागुल
अक्षरचित्र-विष्णू थोरे


नाते
प्रीत बावऱ्या राधेलाही भुरळ घालून जाते
जगावेगळे मला वाटते तुझे नि माझे नाते
नको चाँदवा नको चाँदणे अलवार तुझ्याभेटी
मेघ दाटल्या आभाळाला नकळत ओझे होते
निर्मोहाचा घेऊन धागा हृदयी गुंफत जाते
त्या जरतारी हृदयालाही आभास तुझे होते
मौन वैखरी बोलुन जाते मूक प्रितीची भाषा
करार शपथा पल्याड आहे अनवट माझे नाते
ओढ घेऊनी जन्मा आले एक अनामिक नाते
नावासाठी ठार कशाला तुझे नि माझे नाते
तिच्याच ठायी जीवन जगते प्रतिबिंबी रूप माझे
जगावेगळे मला भासते तिचे नि माझे नाते
- पल्लवी शिकडे
नाशिक.
अक्षरचित्र-विष्णू थोरे



पाणी म्हणजे समुद्राचा
घाम असतो बंधू
हिरव्या हिरव्या देवकीचा
शाम असतो बंधू

ढग रडतात,ओरडतात
वारा म्हणतो गाणी
तेव्हा कुठे आपल्याला
मिळत असतं पाणी

लक्षात ठेव पाण्याशिवाय
डोळे जातात आटून
जमीन सुध्दा जात असते
उभी आडवी फाटून


पाणी म्हणजे मातीच्या
तिजारीतील ठेव
जपूणच वापरूया
आकाशातील देव

- विनायक पवार

पाणी म्हणजे..!


अक्षरचित्र-विष्णू थोरे


प्रारब्ध
प्रारब्ध
प्रारब्ध
गट्टी जुळून येते... येथे कधी कुणाशी
संवाद होत असतो अलवार मग मनाशी
तो शोधतो कसाही यास निवास नाही
जोडून नाळ येतो मातीतल्या कणाशी
झाला कधी बदामी जो डाव मांडला तो
मायेत देह रमतो... गुंतून काकणाशी
तावून जात आहे सुख भरजरी उन्हाने
आभाळ चंद्र होते आरास अंगणाशी
भरतो घडा असा की प्रारब्ध जन्म घेते
आत्मा अखंड उरतो क्षण जोडतो क्षणाशी
प्रारब्ध
प्रारब्ध
प्रारब्ध
- परीता बांदेकर
मुंबई
अक्षरचित्र-विष्णू थोरे



या अनाम शहरात
या बेरहम शहरात
आपण दोघे
खोलीत कोंडल्या गेलेल्या
चिमण्यांसारखे
अस्वस्थ
घिरट्या घालतोय
इकडून तिकडे
तिकडून इकडे
शोधतोय
अवकाशाचा एक नितळ तुकडा
ज्याच्यावर एकही ओरखडा
उठला नसेल
जिथे मी टेकवू शकेन
माझे मस्तक तुझ्या मांडीवर
आणि तू टेकवू शकशील
तुझे ओठ
माझ्या कपाळावर
आणि
शब्द होऊन जातील मुके
विरून जाईल सारे धुके
असल्या नसल्यापणाचे
- प्रदीप आवटे
पुणे
अक्षरचित्र-विष्णू थोरे


गोंदुन
जाऊ नको दूर, जीव जीवाले टांगुन
मनावर नाव तुहं, घेतलं गोंदुन...
उभ्या पिकामंदी नको, चालू तू मोकाट
ज्वारीचे धांडे मोठे, हायेत चावट
खेटले जे तुले, म्या ते टाकले सोंगुन
मनावर नाव तुहं, घेतलं गोंदुन...
यौवनाच्या पानामंदी, चुन्यासंग काथ
इलायचीवानी लागे, तुही माही साथ
तुह्या माह्या ईडा आता, जाऊ दे रंगुन
मनावर नाव तुहं, घेतलं गोंदुन...
लोयते रे राधा, किसनाच्या अंगोपांगी
फुलू देणं प्रेम आता, सारं डांगोडांगी
कलेज्याच्या मंदी, तुले घेतलं कोंडुन
मनावर नाव तुहं, घेतलं गोंदुन...
येशीन तू कधी मले, सांग खरं खरं
जीव माहा टांगलाय आता येशीवर
कायजीनं येजो, जीवं जाईन निंगुन
मनावर नाव तुहं, घेतलं गोंदुन...
- प्रमोद स. अंबडकार
मो. ९८२२७३०१२२


घरघर
आई जात्यावर बसायची.
जात्यावर बसून गाणं म्हणायची.
तिच्या गाण्यामुळे
आम्हाला कधी ऐकूच आली नाही
जात्याची घरघर.
काल रात्री
अचानक तिची सावली लांब झाली
अन् ती निघून गेली:
चांदण्यातल्या प्रवासाला !
घरातलं जातं
अजूनही फिरतंच आहे.
जात्याची घरघर मात्र
आता अश्विथामासारखी सैरावैरा...
हरवलेल्या गाण्याच्या शोधात
घरभर...
- प्रशांत असनारे
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# कृष्ण बावरा...



अवखळ, अल्लड, तुला पहाटे
सांगत होतो काही गुज
ऐक-ऐकता उमगे सारे
राहिले न बघ काही दुज


काही कळले भाव मनीचे
मध्येच खुदकन हसलीस तू
अन पसरले मनी चांदणे
तुच तू अन् तूच तू

तेव्हा पहाट होत होती
झाली दाटी दवबिंदूंची
किरणांचीही तव झाली राधा
साथ नुरे ही क्षणकालाची

कळे न काही काय चालले
दिशा संभ्रमित अजून आहे
किरण पसारा फुलत चालला
कृष्ण बावरा अजून आहे

– प्रशांत भरवीरकर
नाशिक


गुलमोहराचं कुकू
गुलमोहराचं कुकू
गुलमोहराचं कुकू
आता पावसा मातीशी कर लगीन साजरं
गुलमोहराचं कुकु तिच्या भांगामधी भर
बाभळीच्या हळदीने कर हळद सोहळा
गळा घालाया मातीच्या आणि गारांच्या दू माळा
तुझी निघू दे वरात बिजलीच्या तालावर...
अक्षदाही टाकतील झाड वाळल्या पानांच्या
येरे पावसा म्हणता टाळ्या वाजाव्या जनांच्या
उन्हाचाही अंतरपाट व्हावा क्षणामधी दूर...
माती येडया आनंदानं जाईल दरवळून
तू घेताना कवळून लाजेल हिरवळून
तुमच्या पहिल्या रातीला लेवो जांभळा अंधार...
कधी पावसा मातीला फारकत नको देवु
तिच्या आधाराला राहो तुझे आभाळाचे बाहु
सूर्य लावील नादाला तुला बोलावील वर...
तरी पावसा तू तव्हा सोडू नको रे संसार
गुलमोहराचं कुकू तुझं ठरू दे रे खरं...
-प्रशांत केंदळे
नाशिक रोड.
अक्षरचित्र-विष्णू थोरे


सांग सांग पांडुरंगा...
वारी दिंड्या पताकांनी
तुझी सजली पंढरी
सांग सांग पांडुरंगा
कसे दुःखं आले दारी
अवकाळी मरणाची
कशी सोडावी ही वाट
किर्तनात शोधु किती
नाही तुझी गाठभेट
बडव्यांनी बाटवली
तुझ्या विचारांची वारी
सांग सांग पांडुरंगा
कसे दुःखं आले दारी
प्रा. प्रशांत मोरे
कल्याण
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# देह झाला पाणवठा...

देह झाला पाणवठा
तरी डोळा नाही पाणी
रडे सागरात मासा
बये पाहिलं का कोणी

या वांझोट्या दुःखाला
दवा लिंबोणीचा पाला
वरी उधाणलं हासू
आत आत गलबला


देह तरंगाच झाड
रंग उडालेला दिस
रोज बुडत्या वस्त्राला
का जळते ही कूस ?


सारं सारं भुलवून
आज सजवला जीव
ढाळलेल्या आसवांची
आली सागराला चव



अक्षरचित्र-विष्णू थोरे

- प्रशांत मोरे
कल्याण


वेळा मावळतीच्या
तू लपेटून आणला आहेस समुद्र
वाळूसहित....
अंगणाचे किनारे झालेत
सूर्य बुडतो आहे पलीकडे...
हे मावळतीचं ऊन
पसरत चाललंय खिडक्यांवर
सूर्यास्त डोळयात मावत नाहीये
आता
पौर्णिमेचा चंद्र उधळेल,
दरवाजे तुटून जातील
उधाणल्या लाटांनी...
बाहुंचा गच्च विळखा
वाहून जाईल निर्जन बेटावर...
समुद्र नक्की कुठे खळळतोय
तुझ्यात
माझ्यात
की
निर्जन बेट गजबजत चाललं आहे ..!
-प्रिया धारूरकर
औरंगाबाद
अक्षरचित्र-विष्णू थोरे


कागदी नावा...
किनाऱ्याने कुण्या लाटेस आता न्याय मागावा?
समुद्राच्या तळाखाली...बुडाल्या कागदी नावा
नकोशी जाहली आहे... तरी आहे हवीशी मी
कळेना नेमका मी कोणता संदर्भ लावावा?
अगोदर नावही माझे तयांना माहिती नव्हते
अचानक जीव माझ्यावर कसा त्यांचा उतू जावा?
इथे खड्डा जरी दिसतो...तिथे बघ टेकडी आहे
कसा दोघातल्या दोघामध्ये समतोल साधावा?
तुझ्या शपथा नको मजला...तुझी वचने नको मजला
तुझ्या डोळ्यातुनी दिसला मलाही कागदी नावा
-राधिका फराटे
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# बूट आणि टाय...




शाळेमधी आले बघ
बूट आणि टाय
मला बी आनशीन का
बाजारातून माय
ऐकलं का माझं
सांगतो मी काय
माझ्या बोलण्याकडं
ध्यान तुझं नाय....

लाल लाल टाय मी
गळ्यामधी बांधिन
काळे काळे बूट माझ्या
पायामधी घालीन
त्याच्या शिवाय शाळेत मी
जायाचो नाय....

पुस्तकं बी फाटलेली
दिली मला आणून
नवी वही बनवली
जुनी रद्दी फाडून
दप्तराची पिशवी बी
फाटकीच हाय...

का वं माय झाले तुझे
डोळे असे वले
गरिबीनी आपल्या का
रडाया लावले
रडू नको माय तुला
मागणार मी नाय
नको बूट नको टाय
आणू नको काय....

हाय तसा माय मी
शाळेला जाईन
शाळा शिकून एका दिवशी
साहेब व्हईन
सायबाला कसा दिसन
कोट आणि टाय...
रडू नको माय
तुला मागणार मी नाय....

- राज शेळके
शांतीनगर, पिंपळगाव बसवंत
नाशिक.
९४२३५४२२२४


अक्षरचित्र-विष्णू थोरे

# एकटीला...

आता तुला जगावे लागेल एकटीला
खोटेच ते हसावे लागेल एकटीला

आलोचना कितीही केली जरी जगाने
पंखाविना उडावे लागेल एकटीला

येईल हा समोर गं रस्त्यातला पहारा
नजरेतुनी लपावे लागेल एकटीला



शब्दाविना कळावी व्यथा कशी जगाला
मौनातुनी निघावे लागेल एकटीला

स्वप्नीतरी दिसावे डोळयातले नजारे
झोपेतुनी उठावे लागेल एकटीला

पटकन कुणी भरोसा केला जरी कुणावर
वादातही झुरावे लागेल एकटीला

गावातली चर्चा ही करतात माकडे ती
थोडे तरी जपावे लागेल एकटीला

या वाढल्या मनूच्या आहेत कारवाया
आता तुला लढावे लागेल एकटीला

राजेंद्र पगारे
चांदवड.
७५१७३६५२७५

अक्षरचित्र-विष्णू थोरे




# निधडा गांधी


वाढदिवसाच्या शुभेच्छा द्यायला गेलो तर
त्यांना बर्थडे स्नान भल्या पहाटे
फायर ब्रिगेडच्या शावरखाली बळंबळं
सचैल
गंमतीनं म्हटलं
ओल्ड मन,चांगलीच चंगळ चाललीय..
दुष्काळातही
...तसे आजोबा सुस्कारा टाकत ओलेत्याने
टुणकन
चबुत-यावरून थेट खालीच.
म्हणाले,डिका,घंगाळातले बे-त्रण तांब्येही
पुरले असते
काय ही घळघळ आंगुळ..हा तर
दुष्काळातला तेरावा.
औत्सुक्याने वसंत दत्तात्रय विषयी विचारले
तर
फटकन तोडुन म्हणाले...
काय पण बोलू नको बाबा..
नुसत्याच खेटा..खालच्यातून वरच्यात,
वरच्यातून सुप्रीमात आन वापस खाली..
फुक्कटचा फुटबॉल..अन तारीख पे तारीख.
मारो सू..गावागावात,चौकाचौकात
वर-खाली आगड पाछड..हुं तो लटकेच छे.
मने तो तरस आव्या छे ते वसंत दत्तात्रय उपर
तेला तो लाईफ अवार्ड-बिवार्ड
पुरस्कार-बिरस्कार दूरच..
डिका आज ते बिच्चारा एकलोच थाय.
मग पंचाला पिळा देऊन ओला हात
माझ्या खांद्यावर ठेवत म्हणाले
ए कवी..चाल ना बाबा..ते वसंत दत्तात्रय
गुर्जर पासे
गांडा कंवा भी भेटला नाय
अन ते फोरासरोड पारनं सम्दं
काय काय लिवलंय..
मी चपापलो,म्हटलं आजोबा
उलट-सुलट,एकसट-बासठ,घातपात-हक्कभंग..
तर चष्म्याच्या काचातून आरपार पहात म्हणाले
डिका,जो तो सही एमना घरे
लै उपकार करदु तेणे मारी उपर
नथुरामच्या गोळयांपेक्षाही भयानक थाय
समदा गांधीरोळ
हा नाय न होय नाय..तरीबी
गोळयाच गोळया..गोळयांवर गोळया
समद्या बाजूनं माझ्याच हत्या..
वसंत दत्तात्रय ने मात्र समद्याला याद दिला बाबा
महात्मा नावाचा मोहनदास करमचंद गांधी.


तोवर वसंत दत्तात्रयाच्या घरी पोहचलो
तर त्याने दारावर डकवलं होतं
अखेरीस..गांधी मला स्वत:हून भेटायला आलाच
तेव्हा वैष्णव जण तो तेणे कहिये म्हणत
अनेक गो-या गोमटया गांधीत
तो शोधत होता
दरबानयात्रेपासून..थेट अंतयात्रेपर्यंत
उघडाबंब निधडा गांधी.

-राजीव जोशी
(कानामात्रा व वेलांटी मधून..)


(संकलन-विष्णू थोरे)


माझ्याच मी मनाशी...
माझ्याच मी मनाशी हसते कधीकधी...
लाजून आरशाला बघते कधीकधी...
काहीच ना कळेना झाले असे कसे
माझीच मी न आता नसते कधीकधी..
उसवून टाकले मी नाते तुझे तरी
ती वीन रेशमाची छळते कधीकधी...
अल्लड मनास माझ्या सांगून पाहिले
प्रेमात साजनाच्या फसते कधीकधी...
शर्यत तुझी न माझी तू जिंकली जरी
प्रेमात मी तुझ्या रे हरते कधीकधी...
बेधुंदया मनाला मी आवरू कसे
शोधात साजनाच्या पळते कधीकधी...
गंधाळला असा तू श्वासातुनी पुन्हा
हृदयात गंध माझ्या भरते कधीकधी...
- रजनी निकाळजे
मुसावक
अक्षरचित्र-विष्णू थोरे



आई
तिच्या कडून शिकले
आयुष्याची बाराखडी
माझ्या स्वप्नांना मिळालं
बळ तिच्या मांडीवरी
कधी ममतेचा हात
कधी पाठीवर थाप
तीच लक्ष्मी या घराची
तीच समईची वात
मोग-याचा ती सुवास
तीच गुळाची मिठास
तिच्या निस्वार्थी मनाला
माझ्या यशाचीच आस
नागमोडी जीवनाची
तिच सुरेख पायवाट
खळाळत्या सागराची
तिच शांत एक लाट
शिकवण दिली तिने
सुचारित्र्य घडविलं
माझ्या मनामधे तिने
अंकुरलं शुद्ध बीज
माझी गुरू माझी माय
तिच्या परी मोठं कोण ?
देव वरचा म्हणे मी
हो भिकारी आईविन..!
- रश्मी सदावर्ते
शेवगाव (नगर)
अक्षरचित्र-विष्णू थोरे




सोन्यामध्ये मढले गं...
सोन्यामध्ये मढले गं बाई तुझे आईपण
आणि पिंजऱ्यात सडले गं तुझे बाईपण
कुणी माळले उरात कुणी जाळले घरात
कुणी देवावाणी तुला बसविले देवळात
बोरी बाभळीची वाट डोई भरलेला माठ
आणि तुझी जिनगानी बाई चढणीचा घाट
बाई शिवाय घराला नाही येत घरपण
राबतांना घरासाठी झाले तिचे सरपण
रडरडण्यासाठीच जणू बाईचा जलम
नाही तुझ्या जखमेला जगी कोणता मलम
तुला तुझ्या घरामध्ये बोलण्याची गं मनाई
पाजलेल्या तू दुधाची झाली अशी उतराई
- रावसाहेब कुवर
साकी. त्रि. घुके
अक्षरचित्र-विष्णू थोरे



कृपा करी ना कृपावंत...
तू सृष्टीच्या कणाकणात
अनंत रूपात अनंत वेषात
विदेही तू निर्गुण निराकार
आत्मारूपी वसशी देहात
तू माईच्या वत्सल पान्ह्यात
तू लेकराच्या गोड हास्यात
तू गाईच्या हंबरण्यात
आणि वासराच्या बागडण्यात
साक्षात तूच मम श्वासात
सतत तुला स्मरते मनात
तूच माझ्या चलनवलनात
रक्षण करशी हर संकटात
आषाढवारी पंढरीची
कधी न व्हावी खंडित
दर्शनमात्रे तुझ्या विठ्ठला
मोक्षप्राप्ती व्हावी निश्चित
वारकरी बनूनी तुझ्या चरणी
घालीते मी साष्टांग दंडवत
क्षमा आर्जवी आर्ततेने
कृपा करी ना कृपावंत
- सौ. रेश्मा गवळी-ससाणे
बजाजनगर
औरंगाबाद
अक्षरचित्र-विष्णू थोरे


मुलगी रांगोळी काढत असते
मुलगी रांगोळी काढत असते
मुलगी लहान असते तरी
अंगण झाडण्याचे कौशल्य
असतं तिच्यात उपजतच
विस्तीर्ण मोकळ्या अंगणात
ती काढत असते रांगोळी
तिच्या मनातले रंग
उतरत जातात सारवलेल्या मातीवर
खोडकर उनाड मुले
विस्कटून टाकतात
सगळे रंग
जाणून बुजून
तिच्या जवळ रंगाचा
अक्षय कुंभ भरलेला
नवरी झाल्यावर घेते
मेंहदी काढून तळहावर
तिला नको असली तरीही
रंग भरण्याचा तिचा दुसरा डाव
संसाराचा
पुन्हा रेखाटते रांगोळी
वृंदावन, गोपद्म आणि बरंच काही
पुन्हा पुन्हा पुसले जातात रंग
आणि बिघडत जाते रंगावली
मग ती समर्पणाचे रंग भरू लागते
तिच्याही नकळत
मुलगी म्हातारी होते
अंगणात तिची नात
रांगोळी काढत असते
कोणता रंग कुठे भरू?
विचारत जाते आजीला
सर्व रंग एकत्र केले की
काळा रंग बनतो,
हे मात्र आजी
कधीच सांगत नाही नातीला
मुलगी मात्र
रांगोळी काढत असते
न चुकता
- डॉ. एस. के. पाटील
दाभाडी
अक्षरचित्र-विष्णू थोरे


स्वप्न...
स्वप्न...
स्वप्न...
स्वप्न...
पिढ्यापिढ्यांच्या हक्कासाठी
व्यवस्थेशी लढलेल्या
नक्षीतल्या कामगार नेत्याच्या
पुतळ्याखाली बसून
तो लावत असतो हिशोब
महिनाभराच्या घरखर्चाचा.
बऱ्याच दिवसांनंतर
वजा करत असतो रक्कम
घेतलेल्या उचलीची त्यातून
बाकी शून्याखाली जाण्याआधी
तो थांबतो,
फेकून देतो हातातला कागद
दूर अंधारात.
पेन्सील ने खाजवतो कान,
वाकतो कामगार पुतळ्यासमोर
दुखऱ्या छातीला हात लावून.
सरकारी योजनेतली
झिरो बँक बॅलन्स अकाउंट
ओपनिंगची
जाहिरात फाडून
बटव्यात उरलेली
शेवटची तंबाखू मळत
सारी स्वप्न हातावर चोळत
तो घराकडे निघतो
व्यवस्थेला शिव्या देत
- सागर काकडे
पुणे.
अक्षरचित्र-विष्णू थोरे



अक्षरचित्र-विष्णू थोरे


बामियानाचा बुध्द
पाणावले असतील तुझे डोळे
किंवा नसतीलही
कदाचित तू दिले असशील
तुझे ते मंदस्मित
किंवा नसेलही
जेव्हा बामियानाच्या तुझ्या
भव्य मूर्तीवर तोफगोळे डागले गेले
हजारो वर्षांनंतर सत्याला
त्याच्याच भूमीत हिंसक
हल्ल्याला सामोरे जावे लागले
तेव्हा तू गहिवरून आला असशील
किंवा नसशीलही...
- समाधान महाजन
नाशिक
७५८८९३१४६०
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# संपाचं हत्यार

सपान खाऊ भळलं याड
अंगात भरलं वारं
शिवाराच्या राखणीला
काळजाची धार...

ये धाडी आम्ही, भिती आम्हा,
नसे कुणाची
दुनियेवर राज करू
मर्जी मनाची
नजरेच्या कट्यारीला रोज नवी धार...
शिवाराच्या राखणीला...

(आस्मानी-सुलतानी
घाव रोज ताजे
घरावर मरणाचा
डंका रोज वाजे
जिंदगीच्या लढाईत ठाव नाही हार..
शिवाराच्या राखणीला...

ये नका विकू नका झुकू,
पेटला अंगार
हक्कासाठी उगारू या
संपाचं हत्यार
कुणब्याच्या एकीनं हे हलवू सरकार..
शिवाराच्या राखणीला...

संपाचं हत्यार
संपाचं हत्यार

- विष्णू थोरे
चांदवड.



साजन
असा अवचित
भेटला साजन
हात हाती देता
थरारले मन
भिडला नजर
नजरेला बाई
ओठातुन शब्द
फुटलाच नाही
शिरता कुशीत
उर धडाडला
अवघाची देह
रोमांचित झाला
घट्ट बांधलेल्या
गाठी सैल झाल्या
आणि हातातल्या
बांगड्या रिचल्या
असा अवचित
भेटला साजन
देऊनिया गेला
गोड आठवण
-संदीप काळे
पाथर्डी, नगर
९३५८७३९४९७


थ्रिशोल्ड फ्रिक्वेन्सी घेऊन
मी कधीची फिरतेय
जीवाच्या आकांतानं
तुझ्याभोवती... उपग्रहाप्रमाणे
तू
सूर्याकडे तोंड करून
स्वत: भोवती गिरक्या घेण्यात मग्न!
तुझा चंद्र म्हणवून घेण्यात
धन्यता वाटेनाशी झालीय आताशा
माझ्या विस्तीर्ण अवकाशात झेपावण्यासाठी
निघालं आता माझं मन
तुझी गुरूत्वाकर्षण शक्ती लांघून जाण्याइतकी
थ्रिशोल्ड फ्रिक्वेन्सी घेऊन
अक्षरचित्र-विष्णू थोरे
- संघमित्रा खंडारे
दर्यापूर



अक्षरचित्र-विष्णू थोरे

# यावे पुन्हा वर...

दुबळ्या कुडीत पेटलेला ऊर
मनाचा कापूर सांभाळावा

जीवा लागे जरी सुगंधाचे वेड
चंदनाचे खोड उगाळावे

मोह मत्सराची उतरू पायरी
भेटेल गाभारी सत्वरूप

घेऊनी दर्शन यावे पुन्हा वर
शांतवोनी ज्वर अंतरीचा

- संगीता बर्वे
पुणे

# दळता दळता...

दळता दळता दळून दाणे
गाऊन गाणे तान्हुल्याशी
भुक लागली घे मजला
बाळ विनवी आईशी

एका हाती खुटवळ
दुजा हात झोळीशी
थांब जरासा घडीभर बाळा
तवा तापतोय चुल्याशी



शिजवून भाकर म्हणती गाणे
घेवून चटके हाताशी
रडला रडला निजले पोर
मुख घेवून उराशी

कंठ दाटूनी आला तिचा
घेवूनी लेकरू पदराशी
दळता दळता दळून दाणे
गावुन गाणे तान्हुल्याशी

- संजय घनगव्हाळ
धुळे

अक्षरचित्र- विष्णू थोरे


अशांची होत नाही गिनती
कुणाचाही गळा चिरावा
कुणालाही लाथाडावं
कुणाचंही काहीही
हिसकावून घ्यावं
ही घरं, ही नगरं
ही वस्ती, ही गावं
ही शहरं, हा देश
ही पृथ्वी, हे आकाश
सारं सारं
आपल्याच बापाचं आहे
असं वागावं
असं म्हणणारा तो
त्याच्या समाधीवर
जळत नाही साधी पणती
जगात होत नाही
अशांची गिनती...
- संजय गोडघाटे
नागपूर
अक्षरचित्र-विष्णू थोरे



पळस
नको वसंताचे ऋण
नको तुझे वृंदावन
आता कोठे ओसरला
माझ्या डोळ्यांचा श्रावण
तुझा संपला शिशिर
तुला सोसवेना धीर
माझी पानगळ सुरू
तुला फुलांचं लाघीर
तुझे फुलांचे पाऊल
तुझी गंधाळ चाहूल
करी त्रिवाचा पाचोळा
माझी वेडी रानभूल
तुझ्या चुकांचा कळस
माझा उन्हात पळस
तुझ्या श्वासांच्या मंजिरी
माझ्या शब्दांची तुळस
तुझा पाऊस वांझोटा
तुझा श्रावण अलिप्त
माझ्या ओंजळीत फक्त
तुझ्या वाट्याचा प्राजक्त
नको नको ते शोधले
सहा ऋतुंचे सोहळे
माझ्या डोळ्यांच्या किनारी
फक्त आठवांचे तळे
-संजय गोरडे (सौमित्र)
नाशिक
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# अक्षरपेरणी




## करेंट

आकडा टाकून घेतलेली लाईट
डिम्म झाली
की बाप जाऊन
आकड्याच्या तारेवर चढलेलं
कार्बन साफ करायचा
मग लगेच लाईट चमकायची
पण दारिद्र्याचं आणि कष्टाचं
कार्बन चढलेलं बापाचं आयुष्य
नांगर-तिफणीनं कितीही साफ केलं
तरी चमकत नाही
ट्रॅक्टरनं नांगरलं
औषध फवारलं
तरी बापाच्या आयुष्यात
करेंट काही येत नाही.

- बालाजी मदन इंगळे

अक्षरचित्र-विष्णू थोरे


असा पहिला पाऊस
असा पहिला पाऊस
अशी गंधाळली भुई
तुझ्या तलम केसांची
आठवली शिकेकाई
आठवली शिकेकाई
आले पापण्यात दंव
ओल्या हवेला बोचते
तुझी केशरी उणीव
तुझी केशरी उणीव
नको भिजायाची हौस
जीव काढून मागतो
असा पहिला पाऊस
-सतीश दराडे
अक्षरचित्र-विष्णू थोरे


माहेर
काय सांगु बाई तुला
माझ्या माहेरची रित
माय बाप भावाची ती
जगा वेगळी गं प्रित
माय बाप भाऊ माझे
देती मला सारे सुख
माहेरात जाता मला
नाही लागत गं भुक
सुखी राहु दे रे देवा
सारेच भाऊ बहिणी
मला मिळाली तशीच
मिळो साऱ्यांना वहिनी
माझ्या बोलण्याचा वाटे
साऱ्या साऱ्याला हरीक
दुःख माझे एकताना
होती सारेच गं मूक
दुःख माझे ऐकुनीया
येई डोळ्याला गं पाणी
चेहरे ते पाहुनीया
होते माझी बंद वाणी
शरद ठाकर
सेलू, जि. परभणी.
८२७५३३६६७५
अक्षरचित्र-विष्णू थोरे


बाभूळबन
पिवळ्याजर्द
बाभळीच्या फुलांची
अन् माझी
बालपणापासूनची मैत्री
का कोण जाणे
पण मला फारच वेड
त्या मखमली फुलांचे.
शाळा सुटली की
शेजारच्या झाडाखाली जायची
ओटीभरून फुले
वेचून आणायची
कानात
कर्णफुलाप्रमाणे घालायची
दोऱ्याने गाठी मारून
हातात, पायात बांधायची
तळहात, तळपाय
पिवळे धम्मक
करून टाकायची...
माझ्यासहीत सारं अंगण
पिवळं झालेलं पाहून
आजी रागवायची
व म्हणायची
किती हौस गं तुला?
पिवळं होण्याची...?
काळ गेला आजीसोबत
पिवळ्या फुलांची
मखमल घेऊन
कोटरी बाभूळबन
माझ्या पदरी ठेवून...
- शैलजा कारंडे
लातुर
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# सूर्याची मशाल...बाप माझा

माय दळतसे
दळण सत्वाचे
स्मरण तत्वाचे...
बाप माझा

माय मला वाटे
भूमीपरी ओली
समुद्राची खोली...
बाप माझा

माय माझी मला
घेई पदरात
ठेवी उदरात...
बाप माझा

मायच्या हाताला
निराळाच स्वाद
पियूष आस्वाद...
बाप माझा

माय शोधतसे
मृगजळी सुख
वेदना सन्मुख...
बाप माझा


माय माझी सृष्टी
जपण्या लायक
ब्रम्हांड नायक...
बाप माझा


माय प्रकाशते
घरात कंदील
सूर्याची मशाल...
बाप माझा

- शोभा रोकडे
अमरावती



अक्षरचित्र-विष्णू थोरे


माय माझी...
झळ नाही गं बसत
मला माहेरी उन्हाची
ऊन झेलून सावली
देते मला पदराची
तुझा फाटका पदर
वाटे मखमली शालू
येता कुशीमधी तुझ्या
गप निजते लेकरू
तुझ्या प्रेमाच्या मायेने
सावरले घरकुल
तु गं अन्नपूर्णा माझी
जणू पेटलेली चुल
काळ्या मण्याचा दागिना
तुझ्या गळ्याची श्रीमंती
हिर्वा बांगड्यांचा चुडा
तुझी सांगतो महती
सौभाग्याच्या कुंकवानं
केलं कपाळ हे धन्य
दारी फुलून तुळस
आलं पदरात पुण्य
माय सुगंधी गाभारा
जशी जळणारी धूप
माय माझी माझ्यासाठी
वाटे देवाजीचे रूप
- श्रद्धा खानविलकर
नवी मुंबई
अक्षरचित्र-विष्णू थोरे


बहर
तू हाकलून लावलंस पक्षांना
आणि बाहेर तर
फुलं झडण्याचा ऋतू
सुरू झालाय्.
आता
फांदी न् फांदी
बुलबुलांनी येते बहरून
झाड न् झाड
किलबिलीने मोहरून.
तू हाकलून लावलंस पक्षांना
तेव्हापासून
पाखरांचा ऋतू
फांदीफांदीवर आलाय्
बहरून.
- डॉ. सिसिलिया कार्व्हालो
वसई
अक्षरचित्र-विष्णू थोरे


सजनाची मिठी बाई...
सजनाची मिठी बाई
सुटता सुटंना
पाखरू हे तडफडी
गुमानं बसंना ...॥धृ॥
काचची बांगडी गं
नाजूक हाताला
एकटीच रानी गेली
ठरल्या वेळेला
हुरहुर मनी बाई
सजना दिसंना
पाखरू हे तडफडी
गुमानं बसंना ...
माळून केसामंधी
जाईचा गजरा
आंब्याच्या झाडाचा गं
मोहरं हासरा
गंधाळल्या रानामंधी
सुगंध मावंना
पाखरू हे तडफडी
गुमानं बसंना ...
बाजरीच्या शेतामंधी
वळ भुई सुटली
लागण पाहून चिऊ
मुरक्या हसली
बिलगला नाग बाई
सैल गं व्हईना
पाखरू हे तडफडी
गुमानं बसंना ...
तरना बांड गोहा
उधळं रानात
सावरू गं कसं त्याला
हिरव्या वनात
कडाक्ष तो लई भारी
मन त्याचं भरंना
पाखरू हे तडफडी
गुमानं बसंना ...
अक्षरचित्र-विष्णू थोरे
-श्रीनिवास मस्के
नांदेड.९२७१००८८९९


पायधूळ
तुझा नसूनही तुझ्यात
आजही समूळ मी
तुझीच पायधूळ मी...
सावली तुझीच अन
तुझेच ऊन भोवती
झाड ही असेल अन
जरी असेल मुळ मी
तुझीच पायधूळ मी...
आत खोलवर मला
रूजून ठेवलेस तू
काय ऐकवू कुणास
जात गोत्र कूळ मी
तुझीच पायधूळ मी...
वावटळ तुझीच अन
तुझीच सर्व वादळे
कणाकणात व्याप्त तू
तुझ्या कवेत धूळमी
तुझीच पायधूळ मी...
शुभ्र धबधब्यापरी
अखंड वाहतेस तू
तुझ्यातुनी पुढे पडेल
वाट ती गढूळ मी
तुझीच पायधूळ मी...
श्रीपाद जोशी
मुंबई
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# कुबेराचं धन...

कधी उन्हात भेटावं
कधी उरात पेरावं
पीठ देणाऱ्या जात्याचं
गाणं गळ्यात फुटावं ...

माय सावलीचं झाड
बाप जगण्याचा धीर
उसवल्या अंगाला रे
झोंबे कर्जाचं वारं

पाचोट्याच्या जखमा
किती लपव्याव्या बानं
माय रिकाम्याच पोटी
घेती जेवल्याची आण
दंड घालून साडीला
तिनं सणाला नटावं ...

माय खुरप्याची जोडी
काटा कुटा सावरती
फाटलेल्या पदराला
वाऱ्यासंगं आवरती

जरी फाटका पदर
नाही फाटके रे मन
नाही दागिन्यांची हौस
कुंकू कपाळाचं धन

दुःख बोलावं झाडाला
दुःखं बोलावं मळ्याला
आतड्याच्या आक्रोशात
ओलं करावं गळ्याला
गरिबीची ही श्रीमंती
धन कुबेरानं लुटावं ....



अक्षरचित्र-विष्णू थोरे

- सुनिल जवंजाळ, सांगोला.

# स्त्रीमुक्ती ती काय असते?


स्त्रीमुक्ती ती काय असते?
मला कधीच नाही सापडली सर्वार्थाने
मुक्त झालेली स्त्री कधीच...
मी घेतेय धांडोळा तमाम स्त्रीवादी लढयांचा...
मी शोधतेय पाऊलखुणा माझ्या माणूस असण्याच्या...
मी रेंगाळते उगाच सीतेच्या लक्ष्मणरेषेशी
ऐकू पाहते साद तिच्या अंतर्मनाची...
मी उगाचच थांबते द्रौपदीच्या
आत्माभिमानी अहंकाराशी
अन घेऊ पाहते उरत भरून तिचा युगांत थरार...
गार्गी,मैत्रेयी,म्हादाइसा अन् भावंडाच्या
ज्ञानासमोर कोंडली गेलेली मुक्ताई...
हा शतके उत्खननाचा पिंगा घालीत असतानांच;
मी जाऊन पोहोचते यशोधरेच्या अनासक्त महालाशी
मी उकरते तिने सिद्धार्थाला अनुमती दिली ती रात्र
मी पाहते तिच्या सहनशक्तीचा अनाहत नाद...

डोळ्यात साठवून घेते
गोपा ते भद्रा कात्यायनी हा तिचा प्रवास...
हलकेच उसंत मिळते मला सावित्रीच्या रूपात;
पण पण...
तिलाही ज्योतिबापेक्षा कुठे वेगळे वेचता येते मला
मधल्या कालखंडातील अश्मयुगीन संदर्भ
ग्रंथ धडकी भरवतात माझ्या उरात
जरा कुठे विसावा घेऊ पाहते मन तुझ्या कुशीत
तर तिथेही तुझ्या मालकीहक्काचा सनातन पहारा
नाही घेता येत मग आभाळभरून मोकळा श्वास...
मी करून टाकते घाई घाईत माझ्या उन्मुक्त मनाची कवाडे बंद
न जाणो एक जरी दार किलकिले झाले तर
तू मारशील शिक्का मी स्वैराचारी असल्याचा...



-सुरेखा पैठणे


समर्थन
मला दिलेला शब्द मोडतांना
किती सहज गृहीत धरतेस
तू माझे समजूतदारपण
आणि विसरून जातेस
माझे संवेदनशील मन
तू तटस्थ असतेस
स्वीकारून वास्तव
मी मात्र वेळेचे गणित मांडत बसतो
उपेक्षिला गेलो तरी
तुला समजून घेत
तू समर्थन देण्याआधीच
तुझी बाजू घेवून
माझ्या मनाशी भांडत बसतो
-सुरेश हिवाळे
सेलु, परभणी
अक्षरचित्र-विष्णू थोरे


नात्यागत झाली गत...
नात्यागत झाली गत
पाणी गेलं खोल खोल
सारा कोरडा ठणाणा
कुठे गवसावी ओल
दुःख पाहून सख्ख्याचं
इथं ओलावे ना कडा
माझ्या भेगाळया भुईला
इंचाइंचावर तडा
-स्वाती पवार-गायखे
चांदोरी
स्वर- श्रीराम पोतदार
औरंगाबाद
अक्षरचित्र-विष्णू थोरे


आठवणीतून
आई तशीच संध्याकाळी
उभी असते कठड्यात अजूनही
लेकरांची वाट पहात...
पोरं येतील माझी आता
शाळा कॉलेजातून...
किलबिल करतील पाखरावाणी
भिरभिरतील घरभर...
आई भूक लागली
म्हणून कल्ला करतील खूप
आई अजूनही रोज संध्याकाळी
तशीच उभी असते कठड्यात,
लेकरांची वाट पाहत...
घरट्याबाहेर उडालेले माझे पक्षी
येतील काय पुन्हा परतुनी...
असेच अचानक संध्याकाळी...!
डोळ्यात पाणी अन
प्राण कंठाशी आणून
वाट पाहते रोजच...
माहित असूनही नाही येणार...
भरकन उडालेली पाखरं...
तरीही आस लावत....
आई मलाही तुझी फार आठवण येते गं...
- उल्का वंदना
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# नार मी गुलजार

आले करून सोळा शिनगार
सख्या मी हो नार गुलजार

माळला मी अंबाडी गजरा
रोखल्या सा-यांच्या नजरा
नाक आहे माझे चाफेकळी
झेलते नथीचा भार बाई भार
आले करून....




चित्र-विष्णू थोरे

कानी मोतियाची बुगडी
नेसली हो पैठणी लुगडी
काठ जरीचे माझ्या चोळीला
पदरानं घालीते वारा गार
आले करून....


कमरपटा शोभे कमरेला
चाळ बांधले कोमल पायाला
नाचते देहभान विसरून
गाण्यात अमृताची धार
आले करून.....

-सौ. वंदना गांगुर्डे
नाशिक.


वयपालखी
लाल गुलाबी
आणि अबोली
उमलुन आल्या
वेळा
रानात पोरी
भिंगरी झाल्या
जीव गुंतला
खेळा..
रानाचा डोळा
देह आईना
पदर राहीना
डोई
वय पालखी
वाहुन नेण्या
दिवस झाला
भोई...
- विष्णू थोरे चांदवड.
९३२५१९७७८१



दव थेंबांची शाळा..
बांधावरती कुजबुज करती दव थेंबांची शाळा
फळा फोडण्या लगबग उठती अंधाराचा काळा
हिरव्या हिरव्या तृण पात्यांच्या हिंदोळ्याला झोके
अन् किरणांना भेटायाचा उगाच करती चाळा
जसा माळतो सूर्य नभीचा रंग केशरी चाफा
उडू लागतो हळूहळू मग वाऱ्यासंगे ताफा
दंगा मस्ती सरून जाते विरून जाते पाणी
घोर लावते हृदयाला या मुक सृष्टीची गाणी
बालभारती धडा संपला पुढे वाजली घंटा
अंक गुणाचा कुठे सोडवू कातरवेळी तंटा
सहा ऋतूंची रोज नव्याने बदलत जाते शाळा
दव थेंबाचा चढवून येतो चमचमणारा वाळा
- विजया गायकवाड
नांदेड.
अक्षरचित्र-विष्णू थोरे



दुष्काळ
आला दुष्काळ दुष्काळ नको माणसा घाबरू
तुझं माझं दुःखं एक बोले रानाचे पाखरू
तप्त माथ्यावर सूर्य आग ओकीत तळपे
उभं वावरात पीक पाण्यावाचून करपे
विहीर सांगळ्याचं पाणी वाफ्या वाफ्यानं पाझरू...
काळ्या मातल्या नभाची किती करावी याचना
जीव कासावीस होतो पाणीपाणी म्हणताना
धारा घामाच्या देहाला थोड्या आवरू सावरू...
रान उदास उदास मुकी पाखरांची वाणी
अर्धभुकेल्या पोटानं कुणी शोधी अन्नपाणी
गोठ्यातल्या गाईचेही भुके वासरू वासरू...
नित्य नव्याने जगणे रित माणसाची जुनी
काळ्या कातळाच्या देही जसे पाझरते पाणी
गाळभरल्या विहिरी आता नव्याने उकरू...
- विजयकुमार मिठे
पालखेड (ता. दिंडोरी)
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# वीण

आई घालत राहायची उलटसुलट टाके
तरीही तिचं विणकाम सरळच दिसायचं...
मी देखील तसंच तर केलं!


एकच... फक्त एकच टाका
उचलायचा राहून गेला,
तर उस्कटूनच गेलं सारं
अगदी मुळातूनच!





आता पुन्हा नव्यानं गाठी बांधणं आलं,
रंगाची जुळवाजुळवही आली...
करेनही मी ते सारं
पण फिरून
उस्कटणारच नाही माझी वीण
याची काय खात्री?

अक्षरचित्र-विष्णू थोरे

– संगीता अरबुने
वसई


जोतिराव फुल्यांचं चित्र
नेमकं कधीपासून फुल्यांचं चित्र
भिंतीवर अडकवून ठेवलंय, माहीत नाही
सहसा त्याकडे लक्ष जात नाही
लक्ष जाऊनही चित्र डोळ्यांत शिरत नाही
दररोजच्या व्यापातून मग
कधीतरी सवड काढून
लक्षपूर्वक चित्र निरखतो
रंग... रेषा... रूप...
मध्येच काय होतं कळत नाही
भीती वाटू लागते की,
चष्मा न लावण्याच्या अट्टाहासामुळे
नंबर वाढून एक दिवस निकामी होतील डोळे
किंवा साचत जाईल मळ भराभर कानांत
किंवा कानातली पोकळी भरून काढील एखादं हाड
दुर्लक्ष केल्यानं
त्यापेक्षा-
पाठीचा कणा ताठ ठेवायला शिकलं पाहिजे
किंवा मग नियमित योगासनं केली पाहिजेत,
आरोग्य जपलं पाहिजे,
पाणी गाळून आणि उकळून प्यायला हवं.
मग हळूहळू जाणवतं
फुल्यांचा पाठीचा कणा इतका ताठ कसा ?
आणि आपला अवघा देहच
का असा निर्णायक क्षणी
होऊ लागलाय लोकागोळा !
- वीरधवल परब
अक्षरचित्र-विष्णू थोरे


भीम गेला परदेशी...
स्पर्शा विटाळ झालेला
झाली सावली नकोशी
बाबासाहेब व्हायला
भीम गेला परदेशी
त्यानं आनली डिगरी
ओठ बोलले कानाला
सारी जिंदगी लावली
माझ्या भिमानं पनाला
हाती आली राबायला
आले पंत आलेजोशी...
फाटलेला पांगलेला
माणूस भिमानं शिवला
आम्ही मळक्या खिशाला
पेन शाईचा लावला
गाढ झोपला समाज
मुक घेवून उशाशी...
नवी जागली सकाळ
निळं चकाकं आभाळ
भिम विचारांचा सूर्य
करी जगाचा सांभाळ
हाती झेंडा घेवून
आता झगडू दिशांशी...
- विष्णु थोरे
चांदवड.

# शहर


घराला डोळे असतात खिडकी नावाचे
आणि शहराला पाय रस्ता नावाचे
शहरातल्या बिल्डिंगज म्हणजे
आकाशाला कवेत घेण्यासाठी
उंचावलेले हात
त्यातल्या घरांच्या
दार... टेरेस, गॅलरी आणि

रस्ते, बिल्डिंगज
यांची एक असते आपापली भूमिका
कुठली ते माहीत नाही
पण असते खरी
तुझ्या माझ्या सारखीच
पण बजावत ते ही नाहीत
नसावेत
नाहीतर खिडक्या रडू लागल्यावर
शहर पाय पोटाशी धरून
हातानी डोळे चोळत
बसलं नसतं का...

असं काहीच होत नाही
रस्ते नावाचे पाय पसरत राहतात
बिल्डिंग नावाचे हात
आकाश कवेत घेत राहतात
आणि खिडकी नावाचे डोळे
रडत राहतात

शहर माणसाला हवं तसं
धड धाकट वाटत राहतं...

-विशाखा विश्वनाथ



अक्षरचित्र-विष्णू थोरे



माणसं... माणसं... माणसं... माणसं...
दूरची माणसं जपता जपता
जवळची कित्येक माणसं
चिरडून जातात
"आपलीच आहेत"
ह्या ओझ्याखाली
आपली माणसं असतात
हाकेच्या अंतरावर
काळजाच्या कठड्यावर बसलेली.
पडण्याची भीती नसते
आणि पडतही नाही
तो पर्यंत
जो पर्यंत
"तुम्ही ढकलून देत नाही"...
- विशाल उशिरे
रायगड.
अक्षरचित्र-विष्णू थोरे


लेकी
लेकी अशा पायवाटा
रूढी चालीनं आलेल्या
बंधनात झुडूपाच्या
पुन्हा गुडूप झालेल्या
धाक डोळयांचा साहुन
लेकी कावल्या बावल्या
मनातल्या भिंतीवर
नाही मावल्या सावल्या
घर अडाणी तरीही
लेकी शहाण्या सुरत्या
सासरात माहेरात
तिच्या दोन्हीकं किरत्या
आल्या गेल्या माणसानं
नाव लेकीचं काढावं
लेक अशी आचारीन
ताट भरून वाढावं
लेक अशी पायपीट
नाही जीवाला विसावा
येल कारल्याचा कडू
तरी मोगरा दिसावा
– विष्णु थोरे
९३२५१९७७८१

# वेदनेच्या विहिरीचा...





वेदनेच्या विहिरीचा
बाई तळ लई खोल
दुःखं साकळून येते
मुकी डोळ्यामधी वल

ऊन आलं पायतळी
काटा होवून टोचलं
सपनानं सांधलेलं
मन हिरवं काचलं
औत जिवाचं जुपलं
चाले जिंदगीचा हल
दुःख....


कळ कळी झाली बाई
बळ फुलात येईल
देह पराग खुडाया
कुणी भ्रमर येईल
मरणाची साचलेली
सुटे आता दलदल
दुःखं....

– विष्णु थोरे
९३२५१९७७८१


पाऊस
घे भरून तुझी गं
ओटी पोटी तू उपाशी
मी उन्हातला वेडा
तुझ्या मायेचा संन्याशी
चंद्र जळतो झाडीत
कळ इथे आभाळात
हवी तुझ्या गांधाराला
माझ्या थेंबाची संगत
सैल सोड बंद डोळे
हळू भरू दे हा घट
आज पडत्या थेंबाला
उद्या नाजूक घुमट
डॉ. विठ्ठल भ. शिंदे
चांदवड.
अक्षरचित्र-विष्णू थोरे


पुरुष समजून घेणं कठीणच !
कालवी कोलाहलात दचकतो
"तो"ही अनाहुत हुरहुरीने
धास्तावतात त्याचेही श्वास
निरर्थ रेखीव शांततेत
येता जाता झटकतो स्वतःच
स्वतःवर रेंगाळणारे
नानाविध पोषाखी अंगार
अचानक घोंगावते अगतिकता त्याच्यात
निस्तावणाऱ्या
निबर अहंकाराची
तरी गर्दीत नित्यनेमाने तो शोधतो
स्वतःत गुदमरणाऱ्या कारुण्याला.
मांबावून धुंडाळतो आसमंत
सैरभैर झिंगतो नियती पिऊन
वात्सल्य झिरपतं तेव्हा
नवा गर्भच रुजवू बघतो
स्वतःतल्या आदिम पुरुषात...
अखेर
खालच्या मानेने तो अनुभवत राहतो
बेगडी अस्तित्व झळाळी...
मला दुरूनही दिसते
त्याच्या चेहऱ्यावरची चकाकती शून्यता !
खरंच
पुरुष समजून घेणं तसं कठीणच !
- वृषाली विनायक
अक्षरचित्र-विष्णू थोरे


शोधू आपणच दवा...
आता जाळून पोळून
टाळू प्राक्तनाचे भोग
माणसाला मारणारे
नवे येताहेत रोग
हातोहात पसरते
कोरोनाची रोगराई
जरा थांबावे घराशी
घाई उगी कशापायी
गर्दी माणसांची टाळू
पाळू नियमांचा वसा
जीव मुठीत घेऊन
जपू जीवाचा या ससा
चला खेडयाकडे जाऊ
खाऊ नितळ ही हवा
स्वच्छ निरोगी जगाया
शोधू आपणच दवा
-विष्णू थोरे, चांदवड.
९३२५१९७७८१


पुरुष-१९ !
बाईला कधीच नसतं भय
कोणा देशातून येणाऱ्या विषाणूचं
ना घरात दीर्घकाळ अडकण्याचं!
इथल्या व्यवस्थेत ती
शतकाशतकांपासून लॉकडाऊनच ...
क्वारंटाईनही असू शकते ती
भरल्या संसारात,गजबजल्या घरात !
सध्या जरा जास्तच जाचतोय
चार भिंतीत अडकलेला नवरा
विनाशाच्या भयाण सावटाखालीही
माणसाळत नाहीये त्याचं पुरुषपण !
जगण्यानंतरच्या मरणाला
कधी घाबरली नाही बाई
तिच्यासाठी मात्र अवघडच
सोबतीला मरण घेऊन जगणं !
अशा बाईसाठीही फारच गरजेचं
स्पेशल मास्क, लस, संरक्षक किट ...
पुरुषी व्हायरसचा धोका टाळण्यासाठी !
-हेमराज बागुल
चित्र-विष्णू थोरे

# जुनेर...



आलं आभाळ दाटूनी
दु: ख मनात नाचलं
सारी पाटाच्या अंगणी
अश्रू नयनी टिपलं


वाटे पिचली बांगडी
माझे कपाळ करंटे
झुला झुलाया मनाचा
जातो वेगळ्याच वाटे

सुख क्षणाचे तरिही
दारी सजून बसते
दु: ख मनाचे जरासे
खाल मानेत रूसते

सारं जुनेर आयुष्य
जरा फुलाया बघते
साज फुलांचा लेवून
कळी कळी उमलते...

- नयन भादुले - राजमाने

चित्र-विष्णू थोरे


आलं आभाळ भरून...
आलं आभाळ भरून
गच्च गद्धळ गाभूळ ,
आंबा तो-यात डोलतो..
उगा नाचते बाभूळ.
पाणवा-याचा धिंगाणा
पाला-पाचोळा घेवून ,
' आला..आला ' म्हणतांना..
भिडे अंगाशी येऊन .
चव-या ढाळल्यासारखे
तुरे मक्याचे हालती ,
काळ्या आईच्या दारात..
बळी राजाची पालखी .
असा वर्षाव बेफाम
अंगा-मना होई बाधा ,
कृष्ण पिंपळ हासतो..
चिंब चिंच होई राधा .
-साहेबराव ठाणगे
चित्र-विष्णू थोरे

# रक्ताची किंमत

शिवणकाम करताना
गुंड्या बसवताना
एखादेवेळी सुई घुसते बोटात
रक्ताने भरून जाते सुई
रक्ताचा एखादा थेंब
पडतो कापडावर
तेव्हा सुरू होते वादळी चर्चा
कापड किती किंमतीचे आहे त्यावर
पण....
फाटलेल्या बोटाचं
अन् सांडलेल्या रक्ताचं
कुणाला काहीच वाटत नाही.
रक्ताची काहीच किंमत नसते का?
हा प्रश्न सुई पेक्षाही
जास्त खोलवर
घुसत जातो काळजात...!!



-देविदास सौदागर

तुळजापूर.

चित्र-विष्णू थोरे



# अर्धा मुर्धा चंद्र....!

विरघळलेल्या रात्रीमधला अर्धा मुर्धा चंद्र हवा
हट्टाने ती मागत असते भाव कुसुंबी रोज नवा

सांडत जाती चांदणपक्षी उश्वास प्याले रात्रीचे
उमटत गेले त्याचे भाळी औठ बिलोरी लज्जेचे
आकाशी त्या विझवत नाही कुणीच का तो चंद्रदिवा
विरघळलेल्या रात्रीमधला अर्धा मुर्धा चंद्र हवा

खिडकीमधला चंद्र देखणा आत येतसे वेगाने
चेह-यावरती पसरत जाते लाली त्याच्या स्पर्शाने
रात्रीच्या त्या उत्कट वेळी तिच्या लाभला अर्थ जिवा
विरघळलेल्या रात्रीमधला अर्धा मुर्धा चंद्र हवा

रातराणिच्या सहवासाने रात्र सुगंधी घमघमली
नभात अवघ्या उत्तररात्री एक शलाका चमचमली
जमिनीवरती पहाटवेळी प्राजक्ताचा शुभ्र थवा
विरघळलेल्या रात्रीमधला अर्धा मुर्धा चंद्र हवा

-मानसी चापेकर

चित्र-विष्णू थोरे

# पापाचा पैसा...

पापाचा पैसा सुखाचा वाटतो खड्यात घालतो कधी,कधी
लाचलुचपत करुनी बांधा माड्या, बंगले बडे,बडे
अरे बांधलेले बंगले मातीला मिळतात
जाळलेही जातात कधी, कधी
पापाचा पैसा सुखाचा वाटतो खड्यात घालतो कधी-कधी

काळा बाजारवले बहाद्दर खुशाल तुंबड्या तुम्ही भरा
अरे भरलेल्या तुंबड्या जागेवर जिरतात,टराटरा फाटतात कधी,कधी
पापाचा पैसा सुखाचा वाटतो खड्यात घालतो कधी, कधी

अडलेला पाहून खुशाल नडवा उडवा धुवा पूरा,पूरा
अरे लक्षात असूधा एखादा उठतो छातीवर बसतो कधी,कधी
पापाचा पैसा सुखाचा वाटतो खड्यात घालतो कधी, कधी....

-गितल वंदना भाऊसाहेब बच्छाव.
देवळा (नाशिक).



# हंगाम


हंगाम तर संपलाय
पुढच्या हंगामाची उकीर
मेंदूत घुसवत..
आता जगायचंय
माणसां माणसाना लपवत....

हा हंगाम गेलाय
हातात,
लाचारीची ठीगळं ठेवून...
मूक करून टाकलंय?
डोळ्यात अपेक्षेची स्वप्न पेरून.....

या
हंगामानेच
लगडलेली हिरवी पिवळी फुलं
वाऱ्या वादळात तुडवली...
माती मधली माणसं
माती खाली कायमचीच गाडली......


-किरण संधान
मो.९६३७३४९२५६


अक्षरचित्र-विष्णू थोरे



उमेद...
मीही जगलो मातीत
दिस लोटले नेमाने
काळजाच्या पुस्तकाची
सारी उलटली पाने ....
कधी आपत्तीची अशी
पडे माझ्यावर वीज
मन शुन्यात बुडते
माझी हरवते नीज .....
चंद्र हरवला कोठे
तारे पेटत चालले
दुर क्षितीज काठाला
रस्ते वहात चालले ....
माझा हरवला नभ
चंद्र उगवेल कसा
कुणी धावा मला आता
उजेडाचा भरवसा ....
होई वेदनांचा जन्म
मन फुलांच्या देठात
नव्या उमेदीचे गीत
तरी असते ओठात .....
-दिनेश शिंदे
दहिवद,ता.चांदवड.
चित्र-विष्णू थोरे

# भगाटा

भगाट्याच्या या दिसात
नाही जगणं रं सोपं
करावं लागत्यात
जगायला लय याप.

गेला संपून मिरोग
नाही पाऊस पडला
डोईवरचा पांढरा
ढग खालतंच गेला.

आलं-आलं कायदूळ
गेला पालाबी उडून
मुकी जितराबं आता
मेली पाय ती खुडून


डोळं गाळणारी हिर
गेली कवाच आटून
टाका घालावा कशानं
गेलं काळीज फाटून

नाही कापडाला पाणी
घामासंगट पिळायची
हुंदक्याच्या संगं आता
रोज भाकरी गिळायची.


– नीलेश केदारी शेळके
गडहिंग्लज (कोल्हापूर )
९४२१११२४५५




चित्र-विष्णू थोरे


कफल्लक आयुष्याची झडती घेताना...
- भगवान निळे
मुंबई
माणसांच्या गर्दीतून स्वतःला
वेगळे काढल्यानंतर
खांद्यावर विश्वासाने मान टाकून
ती पेरत जाते स्वप्नांची रांग
समुद्राक्षितिजापर्यंत
त्यावेळी मी
डोळयांतून स्वप्नांना हद्दपार करून
निरभ्र आकाशातील निस्तेज ताऱ्यांना
देत असतो उपमा
स्वतःच्या कफल्लक आयुष्याची
आजुबाजूच्या अस्तित्वाला साक्षीदार ठेवून.
अंगावर फेसाळती लाट
धडक देऊन गेल्यावर
ती गुलाबी स्वप्नांना जोपासत
नि,
मी कफल्लक आयुष्याची झडती घेत
गर्दीच्या लोंढयात विखुरतो
वाळूवर बोटांचे ठसे ठेवून
रात्रभर
इंद्रधनुष्य उशाला घेऊन ती
रंगवीत बसते माझ्यासंदर्भातील तिची स्वप्ने
अन्,
करते रंगांची उधळण आभाळभर
नि, मी
तिला गृहीत धरून
रचीत बसतो मनसुबे आयुष्याशी झगडण्याचे.
दोघांच्याही रात्री सरता सरत नाहीत...
अक्षरचित्र-विष्णू थोरे


नविन वर्ष...
इंग्रजी नववर्षाप्रमाणे
तुही केलंस
तुझं नवीन वर्ष साजरं
कोवळ्या सूर्याला
मागे ठेवून
प्रकाशाच्या झोतात
हजारो माणसांच्या गर्दीत
टाळ मृदंगाच्या गजरात
खुप भाजलं नाही ना रे अप्पा
तुला सरणावर?
हिरव्या बांगड्यांची
भेटच हवी होती का रे
तुझ्या चरणावर?
- देवा झिंगाड
पुणे
चित्र-विष्णू थोरे

# भिकड

कुणी पेरलं बियाणं
कुणी पेरलं नशीब
नशिबाचं झालं दाणं
बियाण्याचा जळे कोंब

सरलेल्या आयुष्याचा
ठरलेला परिपाठ
बुडणाऱ्या नशिबाशी
बांधलेली जून-गाठ

कधी पावसाच्या पायी
कधी जळीताच्या ठायी
हिर्वे लावण्य अर्पिते
लेकरांची काळी आई

खस्ता खाऊनिया मेले
आजवर बापजादे
देही लागला भिकड
त्याने पोखरीले सांधे

नको असा आयुष्याचा
थोरपणा माथ्यावर
पेरलेल्या बियाण्याला
फुटो हिरवा अंकूर

- शशिकांत शिंदे



अक्षरचित्र-विष्णू थोरे



एक जीव...
एक जीव उडता उडला राहिला
एक तीर सुटता सुटला राहिला


डोह खोल ह्या प्रेमाचा केवढा
त्यात जीव पडला पडता राहिला

आज काल पडदा ... पडदा वाटतो
देह आत शिरता शिरला राहिला

आरसाच माझ्यावर रागावता
चेहराच फुटला फुटता राहिला

संपलोच...वाटत होतो... त्या क्षणी
काळ 'वेळ' बघला बघता राहिला

पायवाट चोरून न्यावी वाटली
पाय माझा निघला निघता राहिला
- प्रथमेश तुगांवकर
मुंबई
अक्षरचित्र-विष्णू थोरे



# स्वप्नपंख

पाषाण होते विखुरलेले डोंगरी रानीवनी
स्वप्नवेडा एक त्याने आणले ते वेचुनी

आकार नव्हता रूप नव्हते दगड वेडे वाकडे
लोक हसले तुच्छतेने खूळ कुठले काढले

स्वप्नवेडा शांत होता दृष्टी त्याची आगळी
दगडामध्ये प्रत्येक त्याने मूर्ती होती पाहिली

साकार करणे मूर्ती त्याच्या जीवनाचा ध्यास होता
प्रेम त्याची शक्ति अन् विश्वास त्याचा श्वास होता

स्पर्श त्याचा लाभता पार्थिवता संपून गेली
संस्कार-लेणी लेवुनी चैतन्यमूर्ती उमलली

आज जन्माची कहाणी तीच मूर्ती सांगते
स्वप्नवेड्या माणसांची शब्दपूजा बांधते

डॉ. राजेंद्र मलोसे

अक्षरचित्र-विष्णू थोरे



अक्षरचित्र-विष्णू थोरे

# लग्नाची सी.डी.

बहिणीच्या लग्नाची
सी.डी. बघताना
आख्खं घर गच्च भरलेलं...

नवरी वाटं लावायचा प्रसंग
सुरू होतो टीव्हीवर
डोळ्याला पदर लावून
आई निघून जाते स्वयंपाकघरात

तंबाखू थुंकण्याचं निमित्त करून
बापही पडतो घराबाहेर
लहानगी बहीणही
होते कावरी बावरी...

मीही हातातल्या पुस्तकात
खुपसतो मान
कित्येक वेळ भिजत राहतं
अश्रूंमध्ये
पुस्तकाचं एकच पान...

- संदीप जगताप
चिंचखेड




## शेणाला गेलेल्या पोरी...

पतीच्या निष्ठा
शेण जगाला सांगते
त्याच्या सोबतीसाठी
ती आतून धुमसते
इस्तू अंगावर पडताच
तिच्या फुलण्याला येते गती
आणि
तो विझल्यावर
ती जाते आपोआप सती

-चंद्रशेखर कांबळे
कोल्हापूर.

अक्षरचित्र-विष्णू थोरे


पाऊस हा.......
आठवात लोटतो, पाऊस हा
डोळ्यात दाटतो, पाऊस हा
रूप तुझे वाटतो, पाऊस हा
शब्द कुठे पाळतो,पाऊस हा
अंगणात सांडतो,पाऊस हा
तुझ्यासम भांडतो, पाऊस हा
रोज कुठे भेटतो, पाऊस हा
बेईमान वाटतो, पाऊस हा
कित्तीतरी बोलतो, पाऊस हा
एकटीला पोळतो, पाऊस हा
कुठे कुणा कळतो, पाऊस हा
रोज मला छळतो, पाऊस हा
का असा वागतो, पाऊस हा
काळजास लागतो, पाऊस हा
तृप्ती अंधारे
अक्षरचित्र-विष्णू थोरे

# आरसे....

आरसे माझ्याकडे करून
मोकळे झाले सगळे
मी सगळ्या आरश्यात सारखा होतो

तोंड फिरवून गेलेली माणसं
माझ्या लेखी जमाना झाले
अन त्यांच्या लेखी मी ही

आता आशा-अपेक्षा म्हणून
माझा रस्ता आहे
नाती महाग झालीत
तरी माणसं उरलीत मागे
जुळतील जुळता जुळता धागे

मला येऊन कुणी भेटू नये आता
सांगू नयेत नाती
खेटू नये आता
मी सर्वस्व दिलंय कवितेला


आमचं आम्ही बघून घेऊ
चटणी भाकरी खाऊ
ती माझे आसवं जपत असते सतत
मी तिचे आसवं पुसत राहीन....



चित्र-विष्णू थोरे

-समाधान निकम

औरंगाबाद, 7387470847


मी आणि आम्ही...
किमया अशीच केली, लीलयाच या करांनी
केली माझीच पारध, आमुच्याच पारध्यांनी ॥धृ॥
मी शापित पीडितांनी, मी शोषित शोषितांनी
दमछाक माझी केली, आमुच्याच पावलांनी ॥१॥
फोडला असा टाहो, जनहो मला वाचवा हो
केले मिळुनी गारद, आमुच्याच गारद्यांनी ॥२॥
बंडाळी उभारली, निळी हिरवी लाल निशानी
झेंडयास मांड दिली, आमुच्याच बांधवानी ॥३॥
आप्त स्वकीयांना मस्ती, प्राशुनि घाम आली सुस्ती
सागरा उधान आणिले, आमुच्याच आसवांनी ॥४॥
त्रिभेस माझ्या नाही धार, कंठशोष हा झाला फार
पुन्हा पुन्हा छेडिली तार, आमुच्याच नारदांनी ॥५॥
थकल्या भागल्या जीवास, आवडू लागे एकांतवास
पाठलाग माझाच केला, आपुल्याच सावल्यांनी ॥६॥
- डॉ. पुरुषोत्तम भापकर (भा.प्र.से)
अक्षरचित्र-विष्णु थोरे

# *गौरव महाराष्ट्राचा*

गौरवशाली महाराष्ट्राचा, इतिहास सोनेरी,
साक्ष सांगती खुणा रांगड्या, महाराष्ट्र भूवरी ॥ धृ ॥

साम्राज्याचे कडे दिखाऊ, न्याय लढाईत पडले,
संतांच्या सिध्द वाणीने,न्याय निशाण फडकले,
नैतिक बळ या विश्वासाचे, विजयी झाली वीरश्री.. ॥ 1॥

.........

जगा जगू द्या या मंत्राने, मुलुख मराठी जगतो,
कसलेल्या साहित्य मातीत, महाराष्ट्र नव फुलतो,
धर्म भिन्न परी एकच भाषा, मराठी बोल वैखरी ..॥2॥

..........

महाराष्ट्र हा शिवरायांचा, स्वराज्य ब्रीद पाळतो,
त्याग सांगतो भगवा त्याचा, प्रथम स्वार्थाला जाळतो,
महाराष्ट्राच्या तनामनात, शक्ती अफाट ही भारी... ॥3॥

........

सज्ज स्वागता पर्वत रांगेत, फलद्रूप वनराई,
श्रमिक शेतकरी घास पिकवती, सीमा राखे शिपाई,
गुणसंपन्न महाराष्ट्राला, नमिते शिवाची शाहिरी... ॥4॥


गीत -शाहीर शिवाजीराव पाटील
जिल्हाध्यक्ष महाराष्ट्र शाहीर परिषद



विष्णू थोरे यांची कविता जशी कमी शब्दात व्यापकतेला कवेत घेते त्याप्रमाणेच कमी रेषांमध्ये त्यांची चित्रे अधिक बोलतात. अनेक चित्रांना तर रंगाचीही आवश्यकता नसते. त्यांच्या रेषांमधला अवकाशच आपल्याला अनेक शक्यतांपर्यंत घेऊन जातो. याच रंग-रेषांच्या जोडीला आता महाराष्ट्रातील नव्या पिढीतल्या अनेक कवींच्या कविता आहेत. शेजारी विष्णूचे चित्र. अमूर्ताला मूर्त करण्याचा प्रयत्न जितका अव्दितीय आहे तितकीच यातली प्रत्येक रेषा कवितेच्या शब्दांशी,एकूणच आशयाशी अव्दैत साधते.

महाराष्ट्रातील विविध भूप्रदेशातील, प्रवाहातील कविता वाचकांना एकत्रच केवळ वाचायलाच नव्हे तर पाहायला, अनुभवायला मिळणार आहे. या प्रयोगशीलतेशी आपण नक्कीच एकरूप व्हाल आणि तिचे स्वागत कराल असा विश्वास वाटतो.



-डॉ. नीलेश केदारी शेळके